**व्यवसाय / धंदा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मोः ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...

गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७६ वा | सोमवार, दि. १६ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कृषीमंत्री कोकाटे ओसाड गावचे पाटील,

## नाव'माणीक'आणी कोकाटेंचे कर्तुत्व मात्र 'ढेकूळ'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबावत वादग्रस्त विधान केले होते. 'हार्वेस्टिग झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का?', असे वादग्रस्त विधान त्यांनी केले होते. हे वक्तव्य ताजे असतानाच माणिकराव कोकाटे पुन्हा बरळले. स्वतःच्या मंत्रिपदाबाबत त्यांनी हे विधान केले असून 'कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी' असे ते म्हणाले.

कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर शहरात प्रगतिशील आणि प्रयोगशील शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये बोलताना माणिकराव कोकाटे यांनी स्वतःच्या मंत्रिपदाबाबत वादग्रस्त विधान केले. माणिकराव कोकाटे म्हणाले की, 'कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी, अजितदादांनी मला हे मंत्रिपद दिले.', माणिकराव कोकाटे यांनी कृषी खात्याची महती गाताना ओसाड गावच्या पाटीलकीचा उल्लेख केला.. स्वतः कृषीमंत्री कोकाटे यांनाच कृषी खाते हे ओझे वाटत असेल तर या राज्यातल्या शेतर्कयांनी अशा कृषीमंत्र्यांकडून काय आशा बाळगायच्या ?नाव'माणीक'आणी



कर्तुत्व मात्र 'ढेकूळ' अशा कृषीमंत्र्यांना शेतकऱ्याचे दुःख काय कळणार. शेतकऱ्याला बर्बाद करणारी धोरणे आखून त्यांच्या घरादारावर आत्महत्येचा नांगर फीरवणाऱ्या सरकारकडून आणखी काय अपेक्षा करायची? महाराष्ट्र हा कृषीप्रधान म्हणून ओळखला जातो मात्र राज्याचा कृषीमंत्रीच ओसाड गावचा पाटील म्हणवून घेत असेल तर शेतीला'ओसाड'कोणी केले हेही कृषीमंत्र्यांनी सांगीतले पाहीजे. उद्योगांची हजारो कोटी कर्जे माफ करून काही हजारांसाठी शेतकऱ्यांना तगादा लावून आत्महत्त्या करायला भाग पाडर्णाया या व्यवस्थेवर खुनाचा गुन्हा कोण नोंदवणार ?कधी अतीवृष्टी तर कधी दुष्काळ अशा दुष्टचक्रात भरडून निघणाऱ्या शेतर्कयाला दीलासा देण्याऐवजी त्याच्या जखमेवर मीळ चोळण्याचे काम अशा असंवेदनशील कृषीमंत्र्यांकडून होत असेल तर त्यांची हकालपट्टी करून त्यांना आतबट्ट्याची शेती करायला लावली पाहीजे.म्हणजे त्यांना शेतकऱ्याचे दुःख कळेल.एकाही कृषीमालाला रास्त भाव देऊ न शकलेल्या सरकारविरोधात माजी आमदार बच्चू कडू उपोषणाला बसले आहेत.मात्र दगडाच्या काळजाच्या सत्तार्धायांना पाझर फुटत नाही.या राज्यातला शेतकरी हा सदैव 'याचक'कसा बनेल हेच आजवरच्या सरकारांनी पाहिले मात्र शेतर्कयाला रास्त दर देऊन स्वतःच्या पायावर उभा करावा असे एकाही सरकारला का वाटले नाही.पाण्याचे बारमाही नियोजन शेतर्कयाला का शीकवले जात नाही? उत्पादन बाजारात आल्यावर बाजारभाव नेमके कसे पडतात? दुधात तोट्यात, ऊसात तोट्यात ,भाजीपाल्यात तोट्यात अशी जर शेतीची अवस्था असेल तर शेतकऱ्यांनी फायदा बघायचा कधी? सरकार शेतमाल आयातीऐवजी पुर्णपणे निर्यात का करत नाही? शेतमाल आयात करून स्वतःच्या देशातील शेतर्कयांची माती का करते? याची उत्तरे माणीकराव तुम्हालाच द्यावी लागतील. नाहीतर या राज्यातला शेतकरी तुमच्यावर 'आसूड'ओढल्याशिवाय राहणार नाही.

## जूनच्या पहिल्याच आठवड्यात जिल्ह्यात १७ टक्के क्षेत्रावर पेरण्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात यंदा पावसाने मे महिन्यातच हजेरी लावल्याने कधी नव्हे ते जिल्ह्यात खरीप पेरण्यांना जूनच्या पहिल्या आठवड्यातच सुरुवात झाली आहे. यंदा आतापर्यंत ५७ हजार ४७४ हेक्टरवर (१७. ०१ टक्के) पेरणी झाली आहे. यामध्ये बार्शी, करमाळा आणि सांगोल्यामध्ये सर्वाधिक पेरणी झाली आहे. गेल्या काही दिवसांत जिल्ह्याच्या काही भागांत पाऊस, काही भागात उघडीप असे वातावरण आहे. पण आतापर्यंतच्या पावसाचा विचार करता, जिल्ह्यात पुरेसा पाऊस झाला आहे. आता चांगला वाफसा मिळाल्याने शेतकऱ्यांनी पूर्वमशागतीसह खरीप पेरण्यांना सुरुवात केली आहे. पूर्वमोसमी पावसाने लावलेली दमदार हजेरी व येत्या काळातही चांगला पाऊस पडण्याचा अंदाज यामुळे यंदा खरिपाच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५४५ मिमी आहे. आतापर्यंत त्यापैकी २३२.२ मिमी पाऊस पडला आहे. जिल्ह्याचे खरिपाचे सरासरी क्षेत्र ३ लाख ३७ हजार ९६८ हेक्टर आहे. त्यापैकी आतापर्यंत ५७ हजार ४७४ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

**२२ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान**

मे महिन्यात आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात पडलेल्या पावसामुळे जिल्ह्यात उन्हाळी पिकांसह फळबागांचे आतापर्यंत ३२ हजार ४४० शेतकऱ्यांचे २१ हजार ९८९ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. सध्या या नुकसानीच्या पंचनाम्याचे काम सुरू आहे.

## सोलापुरात पुन्हा पावसाची हजेरी; अक्कलकोटचे कुरनूर धरण भरले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या मे महिन्यात झालेल्या प्रचंड पावसानंतर चालू जून महिन्यात सुरुवातीच्या मृग नक्षत्रामध्ये पावसाने विश्रांती घेतली होती. परंतु नंतर गेल्या दोन दिवसांपासून पुन्हा पावसाने तोंड वर काढले आहे.

या पावसामुळे अक्कलकोट तालुक्यात बोरी नदीला पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असून अरळी गावचा पूल वाहून गेला आहे. तर बोरी नदीवरील कुरनूर धरण पूर्णतः भरल्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे.

अक्कलकोट तालुक्यात दोन दिवस झालेल्या जोरदार पावसामुळे तालुक्यातील अरळी गावचा पूल वाहून गेला आहे. त्यामुळे या गावचा आसपासच्या परिसराशी संपर्क तुटला आहे. दरम्यान, या गावात पुलाची उंची वाढविण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. हा प्रश्न यंदाच्या पावसात पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रश्नावर शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी अर्धवट स्वरूपात राहिलेल्या पुलावरून पाणी वाहत असताना तेथेच ठिय्या मांडून आंदोलन केले.

अरळी गाव अक्कलकोट व तुळजापूर तालुक्याच्या सीमेवर आहे. तुळजापूर, नळदुर्ग परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अरळी गावच्या शिवारात पाणी घुसले आहे. तेथील तुलनेने कमी उंचीच्या पुलावर पाणी वाहून जात असताना पाण्याचा जोर वाढला आणि पूल वाहून गेला आहे. त्यामुळे परिसरातील तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग,



इटकळ, खानापूर, केशेगाव, बाभळगाव, सराटी तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदूळवाडी व अन्य गावांशी असलेला संपर्क तुटला आहे.

अरळी गावचा पूल गेल्या वर्षी पावसामुळे मोडकळीस आला होता. पुलाचे दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे वाहून गेले होते. त्यामुळे ग्रामस्थ गेले वर्षभर जीव मुठीत घेऊन या पुलावरून ये-जा करीत होते. यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीलाच पुन्हा पावसाचा जोर वाढल्यामुळे या गावातील जीर्ण स्वरूपातील पुलाचे शिल्लक अवशेषही वाहून गेले आहेत. अरळी-सोलापूर रस्त्यावर असलेल्या या पुलाची नव्याने उभारणी करावी, अशी मागणी अरळी गावचे सरपंच अजय सकट यांनी केली असून त्याकडे लक्ष वेधण्यासाठी गावकऱ्यांसह सरपंच सकट यांनी मोडक्या पुलाजवळ वाहत्या पाण्यात बसून आंदोलन केले.

दरम्यान, अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर धरण शंभर टक्के भरले आहे. त्यामुळे धरणाचे तीन दरवाजे उघडून बोरी नदीत ४५० क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यात आले आहे. या धरणाची क्षमता ८२२ दशलक्ष घनफूट एवढी आहे. या धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे खालील भागातील आठ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे भरले जात आहेत. या बंधाऱ्यांच्या परिसरातील विहिरीही तुडुंब भरल्या आहेत. दरम्यान, कुरनूर धरण शंभर टक्के भरल्यानंतर धरणातून बोरी नदीत पाणी सोडले जात असताना जलसंपदा विभागाचे सोलापूर विभागाचे उपअभियंता रोहित मलनूर यांनी तेथे भेट देऊन पाहणी केली. एकंदरीत, कुरकूर धरण भरल्याने अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोटसह दुधनी आणि मैंदर्गी या तीन नगरपालिका तसेच काही गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत होत आहे.

सोलापूर जिल्ह्यात सरासरी २१.६ मिलीमीटर पाऊस झाला आहे. दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माळशिरस, सांगोला, मोहोळ आदी भागात पडलेल्या पावसाची जिल्हा प्रशासनाकडे नोंद झाली आहे.

## पुण्यात इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला

### 6 जणांचा मृत्यू; 25 जण वाहून गेले

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुण्यात मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवर धक्कादायक घटना घडली आहे. या नदीवरील पूल अचानकपणे कोसळला आहे. या दुर्घटनेत तब्बल 20 ते 25 जण वाहून गेले आहेत. तर आमदार सुनील शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी दुपारी ही घटना घडली आहे. मावळ तालुक्यात कुंडमळा हे प्रसिद्ध ठिकाण आहे. पावसाळ्यात या ठिकाणी रोज अनेक पर्यटक भेट द्यायला येतात. कुंडमळा ओलांडण्यासाठी येथील इंद्रायणी नदीवर एक पूल बांधलेला आहे. हाच पूल कोसळला आहे. या दुर्घटनेत काही नदीत काही पर्यटक बुडाले होते. त्यातील काही पर्यटकांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर चालू आहे.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली. पूल तुटल्यानंतर या दुर्घटनेत आतापर्यंत किती लोक वाहून गेले आहेत. याची नेमकी माहिती मिळू शकलेली नाही. मात्र प्राथमिक माहितीनुसार या दुर्घटनेत 20 ते 25 लोक वाहून गेल्याची शक्यता आहे.

**6 जणांचा मृत्यू - आमदार सुनिल शेळके**

ही दुर्घटना समोर येताच आमदार सुनिल शेळके यांनी बाचतित केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. घटनास्थळी एनडीआरएफचे जवान पोहोचले आहेत. जमेल त्या पद्धतीने मदतकार्य केले जात आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका जाऊन पोहोचल्या आहेत. नदीत वाहून गेलेल्यांना बाहेर काढण्याचे काम चालू आहे, अशी माहिती सुनिल शेळके यांनी दिले आहे. तळगाव नगरपरिषदेची टीमही घटनास्थळी पोहोचली आहे, अशी माहिती आमदार सुनिल शेळके यांनी दिली आहे.



**मृतांचा आकडा वाढण्याची भीती**

घटनेची माहिती होताच स्थानिक प्रकाश घटनास्थळी पोहोले आहे. स्थानिक लोकांकडूनही बचावकार्य केले जात आहे. आमदार सुनिल शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत सहा जणाचा मृत्यू झाला आहे. मृतांचा हा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## अकलूज मध्ये सर्रास होत आहे स्वस्त धान्यांचा काळाबाजार

### हॉटेल धंदे, भुसार मालाचे व्यापारी तर राईस नाश्ता विक्रेते यांच्याशी जुळली नाळ

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज मधील दोन,तीन स्वस्त धान्य दुकाने सोडली तर सर्रास शासकीय धान्याचा काळाबाजार करण्याचा कारनामा आणि महापाप,अकलूज मधील स्वस्त धान्य दुकान चालकच करत असून,काही हॉटेल धंदेपासून,काही भुसार मालाचे व्यापारी, तर काही राईस नाश्ता विक्रते यांच्याशी धान्य काळा बाजाराची नाळ जोडली गेली आहे.यामुळे सदरची बाब अत्यंत गंभीर होत चालली असून,पुरवठा विभागाने झोपेचे सोंग घेतले आहे असे राशन ग्राहकांतून संताप व्यक्त केला जात आहे.



अकलूज मध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय धान्याचा काळा बाजार होतो आहे हे अकलूजच्या पंचक्रोशीला माहीत आहे. केवळ स्वस्त धान्य दुकान चालकांच्या गुंडवृत्ती पार्श्वभूमीमुळे,स्वस्त धान्य दुकानदार यांच्या विरुद्ध कोणीही तक्रार करण्यास पुढे येऊ शकत नाही, अशी खंत काही ग्राहकांमधून व्यक्त होताना दिसत आहे. आम्ही जर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या विरुद्ध तक्रार केली आणि ते लोक आमचेशी बरे वाईट वागले तर अशी भीतीही काही ग्राहकांनी व्यक्त केली आहे.

समस्त मानव जातीवर काही वर्षापूर्वी कोरोनाने केलेले आक्रमण आणि धडकी भरवणारे लॉकडाऊन, हे अखंड आयुष्य कोणीही विसरू शकणार नाही. कारण उपासमारीची खरी किंमत, ज्यांची हातावरची पोटे होते त्यांना माहित आहे आणि यापैकी कित्येक गोरगरीब जनतेचा उदरनिर्वाह स्वस्त धान्य दुकानातील धान्यावर होत आहे.असे असताना तरीही स्वस्त धान्य दुकानदार यांना गरीब ग्राहकांबद्दल पाझर फुटत नाही.याकडे आता जिल्हाधिकारी यांनी लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे असे मत काहींनी व्यक्त केले आहे. काही दिवसापूर्वी माळशिरस तहसीलदार सुरेश सेजुल यांना विचारण्यात आले होते की,अकलूज मधील गरीब जनतेला वेळेवर शासकीय धान्य मिळत नाही, सदरचे लोक गुंडवृत्तीचे असल्यामुळे, त्यांची तक्रार कोणी करू शकत नाहीत. याबद्दल माळशिरस तहसीलदार सुरेश सेजुल म्हणाले होते, दुकानदारांची चौकशी करून, नियमानुसार कारवाई करण्यात येईल परंतु अद्याप कारवाईचा विषय गुलदस्त्यातच आहे असे वाटते?

> अकलूज शहरामध्ये सध्या काही रेशन दुकानदार वगळता, कोणताच दुकानदार शिधा धारकांना वेळेवर धान्य देत नाहीत. यापूर्वी काही सामाजिक संघटना व राजकीय पक्षाकडून उठाव करूनही परिस्थिती जैसे थे आहे. सोलापूर जिल्हा पुरवठा अधिकारी व तालुका पुरवठा निरीक्षक योग्य अशी कारवाई करत नसल्याने रेशन धारकांची मुजोरी सुरू आहे. राज्याचे नागरी पुरवठा मंत्री व पालकमंत्री यांनी रेशन दुकानदारांच्या भोंगळ कारभारावर अंकुश ठेवणे जरुरी आहे.
>
> **- मोहसीन शेख,**
>
> माळशिरस विधानसभा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शप)




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13


## दरवाढीमुळे शालेय वस्तूवर वर्षभराची बचत एका महिन्यात संपणार

**मुबंई (कटूसत्य वृत्त):-** आधीच वाढलेल्या महागाईमुळे घर खर्च करताना आखडता हात घेणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीय पालकांना आता शालेय साहित्याच्या झालेल्या वीस ते पंचवीस टक्के एवढ्या दरवाढीमुळे विवचंनेत टाकले आहे.

मागील दोन वषार्नंतर वह्या, पुस्तके, पेनसह शैक्षणिक साहित्याच्या दराची तुलना केली, तर यंदा तर वाढले आहेत. जीएसटीदेखील वाढली असल्याने स्टेशनरीवर त्याचा परिणाम झाला आहे. स्टेशनरी वरील 12 टक्क्यांची जीएसटी 18 टक्क्यावर गेली आहे, परिणाम स्वरूप शैक्षणिक साहित्यात 20 ते 25 टक्के दरवाढ झाल्यामुळे बाबांचा खिसा रिकामा होत आहे.



कागदाचा तुटवड्यामुळे शालेय वह्यांच्या किमतीत 40 ते 50 टक्के दरवाढ झाली आहे. याचा फटका पालकवगार्ला बसत असून, मुलांच्या शिक्षणासाठी ठेवलेली राखीव पुंजी महागाईमुळे या वर्षात खर्च करणे भाग पडत आहे. 50रुपयाला मिळणारी साधी कंपास पेटी 70ते 80 रुपयांना मिळत आहे. खोडरबर दोन रुपयाला मिळत होता आता ते पाच रुपयांना मिळतो.

**स्कूल बॅगच्या किमती वाढल्या**

आडव्या स्कूलच्या जमाना संपला असून आता सॅगबॅगला विद्यार्थ्यांची पसंती आहे. मागणी वाढल्याने त्यांच्या किमती 250 ते 300 रुपयांच्या घरात आहेत. क्राफ्ट कलेसाठी लागणारे 700 आर्ट पेपर, कलर पेपर आणि इतर साहित्याचे किमती दहा रुपयांनी वाढल्या आहेत. प्रिंट आउट, झेरॉक्स व इतर लिखाणासाठी लागणारे 70 जीएसएम ए/ फोरची रिम ही 150 रुपयांवरून 200 रुपयांवर गेली आहे.

- उत्तम बॅग 400 रुपयांपर्यत
- वस्तूंच्या दरात सुमारे 20 टक्के दरवाढ आहे,
- 20%दरवाढ शाळेय साहित्यात झाली आहे.

## पुण्यातील गुन्हेगाराचा मोहोळमध्ये एन्काउंटर



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील फरारी सराईत गुन्हेगार शाहरुख ऊर्फ अट्टी रहीम शेख (वय 23) याचा पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी लांबोटी (ता. मोहोळ, जि. सोलापूर) येथे एन्काउंटर केला.

पोलिसांचे पथक आल्यानंत शाहरूख शेखने स्वतःजवळील पिस्तूलमधून गोळीबार केल्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मात्र, लांबोटी येथील एका युवकाच्या फोनवरून शाहरूखने पत्नीला फोन केला आणि त्याच वेळी पोलिसांना त्याचे लोकेशन मिळाले, त्यावरूनच पोलिसांनी शाहरुखचे एन्काउंटर केले.

पुण्यातील काळेपडळ पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या एका फिर्यादीवरून पुणे पोलिस शाहरूख शेख याच्या मागावर होते. शाहरूख हा मोहोळ तालुक्यातील सोलापूर-पुणे महामार्गावरील लांबोटी येथे राहत असल्याची खबर पुणे पोलिसांना लागली होती. त्यानंतर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेचे एक पथक शाहरूख याला पकडण्यासाठी शनिवारी रात्री सोलापूरकडे आले होते.

पुणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पहाटे साडेतीनच्या सुमारास लांबोटी येथे सापळून रचून शाहरूख शेख याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पोलिस आपल्याला पकडण्यासाठी आले आहेत, हे लक्षात येताच शाहरूखने पोलिसांवर गोळीबार केला. त्यामुळे पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात शाहरूख शेख हा गंभीर जखमी झाला. त्याला सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, शाहरूख शेख याच्यावर हडपसर, कोंढवा आणि वानवडी पोलिस ठाण्यात १५ पेक्षा गुन्हे दाखल आहेत. तो पुणे पोलिसांना चकवा देऊन फिरत होता. मात्र, सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील लांबोटी गावात ते अखेर पोलिसांच्या हाती लागला. मात्र, पोलिसांच्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला.

(पान 2 वर..)

## संपादकीय

# हिमकड्यांची आर्त किंकाळी

काही दिवसांपूर्वी निसर्गरम्य स्वित्झर्लंडमध्ये हिमस्खलनाची घटना घडली. आल्प्सचा महाकाय ग्लेशियर पर्वतरांगेत असलेल्या ब्लॅटन गावावर कोसळला आणि अख्खे गाव त्यात गाडले गेले. सुदैवाने तेथील तीनशे जणांना अगोदरच सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. प्रशासनाने वेळीच खबरदारी घेतल्याने लोकांचे जीव वाचले. ग्लेशियरला तडे आणि तुटण्याची शयता पाहून प्रशासनाने वेगाने हालचाली केल्या. गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक तापमानवाढीमुळे हिमकडे तुटण्याच्या किंवा कोसळण्याच्या घटना वाढत आहेत. संयुक्त राष्ट्राने ग्लेशियर संरक्षणासाठी 2025 हे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले आहे. याच वर्षात पॅरिस कराराला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. त्यात अनेक देशांनी औद्योगिक क्रांतीच्या अगोदरपासून वाढलेले दीड अंशाचे तापमान मर्यादित ठेवण्याबाबत बांधिलकी व्यक्त केली आहे. या स्तरावर तापमान रोखणे हे ग्लेशियरची हानी थांबविण्याचा एकमेव पर्याय आहे. साहजिकच यावर्षी आपल्याला कमी उत्सर्जन करावे लागेल. आज जागतिक पर्यावरणाचे अभ्यासक कालांतराने ग्लेशियर्स लुप्तही होऊ शकतात, असा इशारा देत आहेत. आपण आताच सावध झालो नाही तर जगभरातील समुद्राची पातळी वाढून आपल्या विकासाच्या इमल्यांना जलसमाधी मिळेल.

वाढती उष्णता आणि हिवाळ्यात कमी होणारी हिमवृष्टी पाहता हिमनदी पुढे (आकार आणि द्रव्यमान) जाण्यासाठी पुरेशा प्रमाणात बर्फ तयार करण्याचे काम थांबवू शकते. परिणामी हिमनदीचे अस्तित्व हळूहळू संपुष्टात येऊ शकते. गेल्या महिन्यात शास्त्रज्ञांनी विविध समुदाय आणि स्थानिक सरकारच्या प्रतिनिधींशी ग्लेशियरचे कमी होर्णाया प्रमाणाबाबत व्यापक बैठक घेतली. जागतिक हवामान विज्ञान संस्थेच्या 2024चा जागतिक हवामान बदलाचा अहवाल पाहिला तर मागचे वर्ष हे गेल्या 175 वषार्तील सर्वात उष्ण वर्ष असल्याचे म्हटले आहे.

याप्रमाणे मार्च महिन्यात प्रकाशित संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालात जागतिक तापमान आणि उत्सर्जन यातील वाढ पाहता पर्वतरांगावर होर्णाया परिणामाची माहिती दिली आहे. यात 21व्या शतकात अनेक पर्वतीय हिमनद्या नामशेष होऊ शकतात, असे म्हटले आहे. दुर्दैवाने अन्य नैसर्गिक घटनांप्रमाणे पर्वतावरील ग्लेशियर, बर्फ आणि पर्माफ्रॉस्ट (साचलेल्या बर्फाची जमीन)मध्ये होणारा बदल हा प्रसारमाध्यमातून ठळकपणे दिसत नाही. जंगलातील वणवा, उष्णतेची लाट या गोष्टी जगासमोर सातत्याने कोणत्या ना कोणत्या माध्यमातून येत असताना ग्लेशियर वितळण्याचा मुद्दा हा गौण मानला जातो.

विशेष म्हणजे पृथ्वीवरील 60 ते 70 टक्के गोड्या पाण्याचे स्रोत म्हणून याकडे पाहिले जाते. त्यामुळे संयुक्त राष्ट्राचे ताजे निष्कर्ष आपल्यासाठी चिंतेचा विषय असायला हवेत. ध्रुवीय बर्फ वेगाने वितळत असल्याने समुद्राची पातळी वाढत असून सखल भागात पुराचा धोका वाढत आहे. परंतु पर्वतीय ग्लेशियर आणि बर्फ वितळल्याचा फटका तुलनेने लवकर बसू शकतो आणि तो काहीवेळा विनाशकारीदेखील असू शकतो. अनेकदा तर अर्थकारण आणि मानवी वस्तीवरही त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. अर्थात, ग्लेशियर वितळण्याचे एवढे विदारक चित्र आशिया खंडाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खंडात दिसत नाही.

आशिया खंडात तर निम्मी लोकसंख्या नदीकाठावरच राहते. या नद्यांचा उगम हिंदकुश हिमालयातून होतो. हिंदकुश ही 3500 किलोमीटर लांबीची पर्वतरांग आहे. दोन धुव्र वगळता या ठिकाणी अन्य कोणत्याही क्षेत्रापैकी सर्वाधिक बर्फ जमा होतो. बर्फ वितळण्याची प्रक्रिया ही आजची नाही. वर्ल्ड ग्लेशियर मॉनिटरिंग सर्व्हिसच्या एका अभ्यासानुसार, 2000 ते 2023 या काळात पर्वतीय हिमनदीने सहा ट्रिलियनपेक्षा अधिक बर्फ कमी झाला आहे. अर्थात हा ग्लेशियर एकूण वस्तुमानाच्या केवळ 5.4 टक्के आहे. बर्फ सध्या वेगाने वितळत आहे. कारण संशोधन होण्यापूर्वीच्या दशकांपासून ते पुढच्या दशकांपर्यंत वितळण्याच्या प्रमाणात 36 टक्के वाढ नोंदली गेली. यात युरोपातील आल्प्सला सर्वाधिक फटका बसला.

या ठिकाणी शतकाच्या प्रारंभापासूनच आतापर्यंत ग्लेशियरचा 39 टक्के भाग वितळला आहे. 'रॉकीज'ने देखील आपल्या वस्तुमानाचा स्वतःचा वाटा जवळपास गमावला आहे. आशियातील (चीन, अफगाणिस्तान, नेपाळ, भारत, पाकिस्तान, भूतान, कझकिस्तान, उझबेकिस्तान, किर्गिजस्तान आणि ताजिकिस्तानचा पर्वतीय भाग) हिमकडे आणि ग्लेशियर वितळण्याची प्रक्रिया सर्वात शेवटी होऊ शकते. मात्र या ठिकाणी ग्लेशियरच्या एकूण वस्तुमानाचा पाचवा भाग वितळला आहे. ग्लेशियरच्या आकाराने संथ घसरण ही भारत आणि संपूर्ण पर्वतीय भागातील धोरणकर्ते, अर्थतज्ज्ञ आणि सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरणार नाही. या पर्वतातून वाहणाऱ्या दहा प्रमुख नद्यांच्या खोऱ्यातून आशिया खंडातील अर्थकारण अवलंबून आहे.

ग्लेशियरचे तज्ज्ञ हैदी सेवेरे यांच्या मते, गंगा, ब्रह्मपुत्र आणि सिंधू पाण्याने निर्माण होणारे संकट हे या ठिकाणच्या नद्यांना (याचा तर मोठ्या नद्यांचा समावेश आहे) 'क्रायोस्फियर' बदलाच्या दृष्टीने संवेदनशील करणारे आहे. ग्लेशियर वितळल्याने या भागातील दहा प्रमुख नद्यांच्या काठावर राहणाऱ्या लोकांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. 'इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटेन डेव्हलपमेंट'च्या मते, या भागातील अंदाजित लोकसंख्या ही दोन अब्जपेक्षा अधिक असून त्यापैकी 31 टक्के लोक अन्नसुरक्षेपासून दूर आहेत आणि 50 टक्के लोक कुपोषणाचा सामना करत आहेत.

आगामी काळात पावसाच्या पाण्याच्या उपलब्धतेत चढउतार आणि दुष्काळाची चिन्हे आहेत. 2050 नंतर या नद्यांतील पाण्याचा प्रवाह कमी होण्याची शक्यता आहे. पाण्याचा प्रवाह कमी झाल्यास, दुष्काळ पडल्यास हिंदकुश हिमालय क्षेत्रात खाद्यान्न, पाणी, वीज आणि उपजीविका सुरक्षा संकटात सापडू शकते आणि त्याचबरोबर वातावरणाची हानी होऊ शकते. शिवाय संघर्ष आणि स्थलांतराचे प्रमाण वाढू शकते.

पान १ वरून

## पुण्यातील गुन्हेगाराचा...

लांबोटीच्या नरुटे वस्ती येथे शाहरूख शेख याचा मावसभाऊ राजू अहमद शेख हा अनेक वर्षांपासून राहत आहे. शाहरूख शेख हा गेली आठ दिवसांपासून लांबोटीत मावसभावाकडे राहायला आला होता. तो नंबरप्लेट नसलेली स्कुटी घेऊन आला होता. तो सकाळी लवकर घराबाहेर पडायचा आणि रात्री उशिरा घरी यायचा. मात्र, त्याच्या वागणुकीबद्दल आम्हाला काहीही माहिती नव्हती, असे शाहरूखच्या नातेवाईकांनी सांगितले.

**....अन शाहरूख फसला**

शाहरुख शेख हा दिवसभर बाहेर फिरायचा. लांबोटी येथील एका युवकाकडून मोबाईल मागून त्याने पत्नीशी संवाद साधला आणि इथेच तो फसला. पोलिसांचे लक्ष शाहरूखच्या कुटुंबीयांवर होते. शाहरूखने पत्नीला केलेल्या कॉल ऐकला आणि त्या फोनच्या लोकेशनवर पोलिस शनिवारी रात्रीच पोहोचले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस शाहरूख झोपलेल्या ठिकाणी दाखल झाले. दरम्यान शाहरूख शेख याने एका एटीएम केंद्रातून चार ते पाच वेळा पैसे काढल्याची माहिती मिळाली आहे.

**लहान मुलाला घेऊन पोलिसांवर केला गोळीबार**

शाहरूख शेख हा नातेवाईकाच्या लहान मुलाला जवळ घेऊन झोपला होता. पोलिस आल्याचे पाहताच त्याने मुलाला कडेवर घेऊन पोलिसांवर गोळीबार केला. मात्र, पोलिसांनी लहान मुलाला कोणतीही इजा न होऊ देता अत्यंत कौशल्याने शाहरूख शेखवर गोळीबार केला.

## प्रबोधन

# वृत्तपत्रांची लाचारवृत्ती

लोकशाहीला सामर्थ्य प्रदान करणारे जे शिक्षण, आर्थिक समृद्धी, वर्गीय सामंजस्य, विषमता निर्मूलन इत्यादी घटक आहेत, त्यात वृत्तपत्रांची भूमिका हा फारच महत्त्वाचा घटक आहे. लोकशाहीच्या इमारतीचे जे आधारस्तंभ आहेत, त्यातील महत्त्वाचा आधारस्तंभ वृत्तपत्रं आहेत. पण आपल्या देशातील हे आधारस्तंभ धार्मिकपणाने पोखरून जाऊन पोकळ बनले आहेत. अशा कमकुवत झालेल्या खांबावरील इमारत किती दिवस तग धरणार? या अनथार्ला जबाबदार आहेत आमच्या वृत्तपत्रांचे थोर संपादक, कसे?

थोर(?) संपादक, वृत्तपत्रकार
अंधश्रद्धा फार, वाढविती ॥१॥
छापती सचित्र वर्णने यात्रेची
चित्रेही देवांची देती मोठी ॥२॥
करती कौतुक किती भाविकांचे
पुराण देवांचे छापतात ॥ ३ ॥
नवसा पावतो अशी जाहिरात
बिल न घेतात करताना ॥४॥
निधर्मीतत्त्वाचा भारत हा देश
का संपादकास कळेना हे? ॥५ ॥
धर्माचे कौतुक करणे अयोग्य
घटनेचा भंग होतो त्याने ॥६॥
धर्मप्रसाराच्या अंतस्थ हेतूने
छापती शहाणे(!) संपादक ॥७॥
घटनेच्या द्रोही छुप्या रुस्तुमांना
वठणीला आणा कायद्याने ॥८ ॥

लोकशाही ही जनमतावर चालते, हे तर सर्वविदितच आहे. हे जनमत घडवण्याचं किंवा बिघडवण्याचं काम वृत्तपत्रं-पयार्याने संपादकच करीत असतात. आजच्या वृत्तपत्रांचं स्वरूप पाहिल्यास जनमत बिघडवून जनतेला अधिक धार्मिक करण्याचं महत्कार्य आमचे थोर संपादक करीत आहेत, असं दिसते.

आमच्या देशातील संपादकांनी सणवारांचं निमित्त साधून धार्मिक प्रदूषण किती करावं? सणावाराला देवांचं मोठं चित्र छापणं, यात्रा-जत्रांची मोठमोठी वर्णनं, देवाचे (निराधार) इतिहास (!), परंपरांचं उदात्तीकरण, खोट्या दंतकथावजा पुराणकथा वाचकांच्या डोक्यात भरवून देणं, ही सर्व पापं आमच्या सुज्ञ संपादकांच्याच पदरात घातली पाहिजेत.

भारतीय राज्यघटना ही धर्मनिरपेक्ष तत्त्वाची आहे, हे माहीत असूनही धर्मभावनेचं पोषण वृत्तपत्रांकडून केलं जात असेल, तर तो घटनेचा अधिक्षेप नव्हे काय? त्यातून विशिष्ट धर्मभावनेचं पोषण या ना त्या प्रकारे करणारे संपादक तर धर्मवीर (की धर्मवेडे?) म्हणावेत असंच आपल्या देशात दुर्दैवाने दिसून येतं. धर्मनिरपेक्षतेचा काही तर सर्वधर्मसमभाव असा सबको सोनामुखी पद्धतीचा अर्थ लावून कृतार्थ होतात.

धर्मभावनेचं पोषण करण्याचा रतीब घातल्यास वृत्तपत्राचा धंदा बरा होतो, असा पोटभरूपणाही समाजघातकीच आहे. चैतन्यप्रेम, पैलतीरावरून, सगुण-निर्गुण अशी सदरं समाजाचं कोणतं हित साधतात? राष्ट्राला पुढे नेतात की मागे? शीर्षस्थानी देवांची चित्रं छापण्याचा हेतू काय? याला प्रतिगामित्व म्हणू नये तर काय म्हणावं? संपादकांचा प्रगट वा प्रच्छन्न हेतू ध्यानी घेऊन त्याची सर्व टीम उदा. स्फुट लेखक, फोटोग्राफर, वार्ताहर त्याला हवा तसा माल तयार करून आपलं लांगूलचालन प्रदर्शित करतात. मात्र हे सारे लोकशाहीबुडवेच असतात हे वेगळं सांगायला नको. गर्वाने कोणत्याही धर्माचं नाव घेणं, हा मागासलेपणा आहे. हा धार्मिक अभिनिवेश जनतेलाही शोभत नाही आणि सुबुद्ध संपादकांनाही शोभत नाही.

आर्य समाजाचे । थोर संस्थापक ।
स्वामी दयानंद। सरस्वती ॥१॥
देवाचे अस्तित्व । त्यांनी नाकारले ।
घटना रंजक आहे त्याची ॥२॥
महाशिवरात्री । बाल कृपाशंकर ।
मंदिरात गेला । दर्शनास ॥३ ॥
रात्र झाली होती । उंदीर गाभारी।
नाचतची होते। देवावर ॥४ ॥
नैवेद्याचे सारे। होते पळवीत ।
बालक चकित। झाला तेव्हा ॥५॥
मनात म्हणाला, । 'सर्वशक्तिमान ।
शंकरास कसे । म्हणतात?`६
उंदीरही ज्याला । हाकलता न ये ।
भक्तांना कसा तो । रक्षणार? ॥७॥
भक्तांच्या संकटी । घालुनिया उडी ।
रक्षण कसे हा । करणार? ॥८ ॥
खरे तर याचे । ईश्वरत्व खोटे ।
भाविकांचा भ्रम । खोटा आहे ॥९॥
तेव्हापासून ते । निरीश्वरवादी ।
जाहले छोट्या या घटनेने`१०
सवयीने झाले । भक्त कुणी त्यांनी ।
कथा ही लक्षात घ्यावी थोडी ॥११॥
सवयीने काही। करू नये कधी ।
विचार करावा । सवयीचा ॥१२॥



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य नको!

सध्या प्रत्येक समाजात समाजकार्य करण्याची स्पर्धा लागली आहे. प्रत्येकजण स्वतःला सामाजिक कार्यकर्ता समजत आहे. स्वतःला सामाजिक कार्यकर्ता समजणारी माणसे सध्या समाजात खूप वाढली आहेत. हे सामाजिक कार्यकर्ते समाजकार्य करतात टिचभर आणि लोकांना आव आणून सांगतात ढीगभर. म्हणजे समाजकार्य करण्यात माझा फार मोठा सिंहाचा वाटा आहे. समाजकार्य करण्यात मी आघाडीवर आहे. सामाजिक कार्यात माझा हात कोणीही धरू शकत नाही. असे इतरांना मीठ मिरचू लावून सांगण्यात ही माणसे फार पटाईत असतात. आपल्या कमी कायार्चा जास्त गवगवा करतात. म्हणजे स्वतःच स्वतःच्या कायार्ची प्रशंसा करून घेतात. मान्य आहे की, आपण समाजकार्य खूप केले आहे. सामाजिक क्षेत्रात तुमचे योगदान खूप मोठे व उल्लेखनीय आहे. तुम्ही समाजाचे जनसेवक आहात.गोरगरिबांच्या, सर्वसामान्य माणसांच्या आणि तळागाळातील लोकांच्या समस्या सोडवण्यात आपण अग्रेसर आहात. म्हणून सामाजिक क्षेत्रात तुमचा हात कोणीच धरू शकत नाही, हे जरी खरे असले तरी आपण एक चूक करतोय, ती चूक म्हणजे आपण केलेले सामाजिक कार्य स्वतःहून लोकांना सांगत बसणे तर आपण केलेले समाजकार्य लोकांना सांगत बसण्याची काहीच गरज नाही.लोकांना आपोआप कळते की, आपण काय समाजकार्य करत आहोत? आणि काय करत नाही? ज्याप्रमाणे फुलांना सांगावे लागत नाही की, मी सुगंधी आहे म्हणून त्यांचा कीर्ती सुगंध आपोआप सर्वदूर पसरतो आणि लोकांना सुगंध देतो. त्याप्रमाणेच आपण केलेले समाजकार्य आपोआप लोकांना कळते आणि समाज आपोआपच तुमचे कौतुक करायला पुढे येतो. बांधवांनो आपण समाजकार्य जरूर करावे, पण आपण केलेले समाजकार्य लोकांना सांगत बसू नये. अशाने आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. आपल्या माघारी लोक आपली टिंगल टवाळी करतात. आपण आपल्याच हाताने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे होते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, आपण जे समाजकार्य करतोय ते केवळ आपल्या स्वार्थासाठीच म्हणजे भविष्यात एखादी निवडणूक लढवण्यासाठी किंवा एखादा सर्वोच्च पुरस्कार मिळवण्यासाठी. कारण आजकाल जिकडे बघावे तिकडे प्रत्येकजण स्वार्थासाठी समाजकार्य करत असल्याचे दिसतोय. कोणतातरी स्वार्थ साधण्यासाठी प्रत्येकाची धडपड समाजकार्य करताना दिसते.अशा सामाजिक कार्यकर्त्यांना पेपरबाजी व बॅनरबाजी करण्याची फार विचित्र सवय असते. कोणतेही सामाजिक कार्य केले की, हे लोक लगेच पेपरबाजी व बॅनरबाजी करतात. काढलेला फोटो सोशल मीडियावर टाकून नुसता कहर करतात.आपल्या कमी कार्याचा सोशल मीडियावर नुसता गवगवा करतात. म्हणजे यांना प्रसिद्धीची खूप मोठी हाव असते. यांना स्वतःचे नाव मोठे व्हावे वाटते. पण अशा लोकांना कोण सांगेल? की, नाव मोठे होण्यासाठी काम देखील तसेच मोठे करावे लागते. तेव्हा लोक आपल्याला आपोआपच मोठे म्हणतात.आपल्या कायार्ची वाहवा करतात. स्वतःला पर्यावरण प्रेमी समजणारे काही महाभाग पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणाचे महत्त्व सांगत फिरतात.पर्यावरण अबाधित राहावे म्हणून मी खूप वृक्ष लागवड केली आहे आणि तुम्ही देखील करा म्हणून लोकांना आवर्जून सांगतात. वर्तमानपत्रांत किंवा सोशल मीडियावर काढलेला फोटो व्हायरल करतात. आणि नंतर त्या झाडांकडे बघत देखील नाहीत. ती झाडे जिवंत आहेत का? का? मेलीत याचे त्यांना काहीही देणे घेणे नसते. म्हणजे हे लोक केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य करतात हे यावरून स्पष्ट होते. जे खरोखर पर्यावरण प्रेमी असतात, ज्यांना पर्यावरणाची खूप खूप आवड असते, ती माणसे झाडे लावतातही आणि ती झाडे मोठी होईपर्यंत त्या झाडांचे काळजीने संगोपन देखील करतात. त्यांना प्रसिद्धीची हाव नसते ना पेपरबाजीची अशा गोष्टीपासून ते चार हात लांबच राहतात. त्यांचे निसर्गावर खूप प्रेम असते म्हणून ते या पृथ्वीला सृष्टीसौंदर्याने नटवण्याचा प्रयत्न करतात.

अशा पर्यावरण प्रेमींना मनापासून सलाम करावा वाटतो आणि केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य करणाऱ्या लोकांना चांगलाच धडा शिकवावा वाटतो. कारण आजकाल समाजकार्य करणे आणि निवडणूक लढवण्यासाठी प्रसिद्धी करणे हे आजकालच्या लोकांचे धोरण बनले आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रसिद्धीला हापापलेली माणसे पाहायला आवर्जून मिळतात. ही माणसे आपला स्वार्थ साधण्यासाठी आपल्या कायार्ची नुसती प्रसिद्धी करत असतात. या पृथ्वीतलावर अनेक महान व्यक्ती होऊन गेले. त्यात समाजसुधारक व क्रांतिकारक होऊन गेले. जसे की, तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान समाज सुधारक आपल्या भारत भूमीत होऊन गेले. यांनी आपले उभे आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील लोकांच्या जीवनाला कलाटणी दिली. या महापुरुषांनी समाज सुधारण्याचे जे काम केले आहे, त्या कायार्ला जगात तोड नाही. आणि यांच्यामुळेच तर आज आपण सुखाने व सन्मानाने जीवन जगत आहोत. खूप खूप शिक्षण शिकून मोठमोठ्या पदावर विराजमान होत आहोत. एवढे अफाट कार्य या महामानवांनी आपल्यासाठी केले आहे, पण त्यांनी या कायार्ची प्रसिद्धी स्वतःहून कधी केल्याचे इतिहासात तर कधी वाचनात आले नाही. या महापुरुषांना जाऊन आज कित्येक वर्ष झाली आहेत तरी सुद्धा हे महापुरुष मेल्यानंतरही कित्येक लोकांच्या हृदयात व मनात कायम जिवंत आहेत. मेल्यानंतरही त्यांची कीर्ती जगभर गाजत आहे. त्यांनी स्वतः स्वतःची प्रसिद्धी न करता, आज जगभर लोकांनी त्यांची प्रसिद्धी केली आहे. आपण तर त्यांच्यापुढे काहीच नाहीत. आपले सामाजिक कार्य त्यांच्यापुढे शून्य आहे तरीसुद्धा आपण प्रसिद्धीला एवढे का हापापले आहोत? कळायला मार्ग नाही. म्हणून बांधवांनो आपण या महापुरुषांचा आदर्श घेऊन खूप खूप सामाजिक कार्य करावे, गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रामाणिकपणे समाजकार्य करावे... एक दिवस आपोआपच आपली सुद्धा प्रसिद्धी होईल... पण केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य नको... हे नेहमी ध्यानात ठेवा...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# ज्ञानाचे अमृत । लाभे शिक्षणाने

संत ज्ञानदेव कोणत्या महाविद्यालयात शिकले? संत तुकोबाराय कोणत्या कॉलेजचे विद्यार्थी होते? असे प्रश्न उपस्थित करून काही विद्वान (?) ज्ञानप्राप्ती आणि शिक्षणव्यवस्थांविषयी काही शंका, संदेह समाजमनात निर्माण करतात. पण शिक्षणाची व्याप्ती जसजशी वाढत जाईल, तसतसे संत ज्ञानदेव आणि आणि संत तुकोबाराय यांना समजून घेणारे वाढत चालले आहेत, या वास्तवाकडे ते दुर्लक्ष करतात. यामागे- बुद्धी ही उपजतच असते; ती प्रयत्न करून, शाळा-कॉलेजं काढून प्राप्त करता येत नाही, असा हा मागासलेपणाचा विचार आहे. तो चुकीचा आहे. उपजत बुद्धी कमी-जास्त असली; तरी ध्यास, प्रयत्न कष्ट, चिकाटी, व्यासंग यांनी ती वाढवता येते, हे लक्षात घेतलं पाहिजे. करत करत अभ्यास के जडमती होय सुजाण - अर्थात, ज्ञानसाधनेने सामान्य बुद्धीला कुशाग्र बुद्धीचं स्वरूप देता येतं. भारतीय ज्ञाननिष्ठांनी तर अत्यंत उत्साहवर्धक इच्छा व्यक्त केली आहे, 'सब पढें, सब बढ़ें!'

पण ज्ञाननिष्ठांच्या उत्साहावर विरजण घालणारे अशिक्षित संख्येने अधिक आहेत की, शिक्षित संख्येने अधिक आहेत; हा मात्र संशोधन करण्यासारखा विषय झाला आहे. शिकला की माणूस वाया जातो, या अडाण्यांच्या गैरसमजुतीला शिक्षितांनीही शिक्षण म्हणजे पढिक पांडित्य, पोपटपंची विद्या, पुस्तकी विद्या, बौद्धिक हमाली असं म्हणून नावं ठेवायचा संप्रदाय रूढ केला, तर शिक्षण- प्रक्रिया मंदावणार नाही का? बरं, पारंपरिक पंडितांना तरी ज्ञानप्रसाराने आनंद होतो म्हणावं, तर तसंही नाही. पंडितांना आपले शिकले की आनंद वाटतो. पण शूद्रादी अतिशूद्राच्या शिक्षणाने मळमळायला लागतं. अन्यथा साक्षरः इति राक्षसः (अर्थात, साक्षर माणूस हा राक्षस असतो.) असं (अ) संस्कृत वचन त्यांनी समजात प्रसृत केलं नसतं. असं करताना आपणाकडे महाराक्षणपणा येतो, हेही ते विसरतात. अशाच एका पंडिताने माजी उपप्रधानमंत्री यशवंतराव चव्हाण मॅट्रिक पास झाल्यावर 'तू आता तुज्या वडिलांप्रमाणे कोर्टात बेलिफची नोकरी कर. पुढे शिकायला जाऊन आयुष्य वाया घालवू नकोस,' असा (बद) सल्ला बिनदिक्कतपणे देऊन स्वतःचं तोंड कायमचं काळं करून घेतलं.

म्हणूनच लक्ष लक्ष विद्यार्थी माध्यमिक, उच्च माध्यमिक असे टप्पे पार करीत पुढे जाऊ लागतात, तेव्हा देशाच्या अज्ञानाच्या अंधारावर मात करण्यासाठी लक्ष लक्ष दिव्यांची प्रकाशमय फौज सज्ज होत असल्याचा आनंद कोणाही सुजाण व्यक्तीला व्हायला हरकत नाही. आपल्या देशाने आजपर्यंत हजारो संगणकतज्ज्ञ, सॉफ्टवेअर इंजिनीयर्स जगाला पुरवलेत. याचा अर्थ आपलं शिक्षण अडथळ्याच्या अनेक शर्यती पार करीत योग्य दिशेने पुढे जात आहे.

भारताच्या शैक्षणिक क्रांतीचा भविष्यकाळ अतिउज्ज्वल आहे यात वादच नाही आणि त्याचं श्रेय महात्मा जोतीराव फुले यांच्या कायार्ला पूर्णतः देणं आवश्यक आहे. शिक्षणाने सामाजिक क्रांतीचं स्वप्न जोतिरावांच्यानंतर छत्रपती राजर्षी शाहूंनी पाहिलं आणि स्वप्नाला साकार करण्यासाठी आपली संपूर्ण राजसत्ता राबवली. त्यांच्या प्रेरणेतून स्फूर्ती घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बापूजी साळुंखे, पुण्याचे जगताप गुरुजी, नाशिकच्या शांताबाई दाणी यांसारखे दिग्गज शिक्षणकार्यात समर्पित भावनेने सहभागी झाले. या त्यांच्या कायासारिखं दुसरं उदाहरण जगाच्या इतिहासात मिळणं कठीण आहे. त्यामुळेच जगाच्या हजार वर्षे मागे असलेला आपला देश पाचशे वर्षे पुढे आला. भाग्यवादी, अध्यात्मग्रस्त भारताने केलेली ही प्रगती निःसंशय चिंतनीय आहे.

तरीही आपल्याला अजून ज्ञानगंगा घरोघरी नेता आलेली नाही. गाव तेथे शाळा, शाळा तेथे शिक्षक, शिक्षक तेथे ज्ञान किंवा तळमळ, यांचा अभावच दिसतो आहे. शिकण्याच्या वयाची निम्मी अर्धी मुलं-मुली शिक्षणप्रवाहात आणणं अजूनही आपल्याला शक्य होत नाही. या समस्येहून मोठी समस्या आहे, आपल्या शिक्षणाच्या स्वरूपाची.

विचारवंत रस्किन यांचा एक विचार आपण लक्षात ठेवला, तर आपलं शिक्षण कार्य योग्य मागार्ने पुढे जाईल. ते म्हणतात, 'ज्या शिक्षणात समाजाच्या, देशाच्या समस्यांचा समावेश झालेला नसतो, त्या शिक्षणाला खरं शिक्षण म्हणता येणार नाही.' म्हणूनच आमच्या शिक्षणातून दारिद्र्यमुक्ती, जातिभेद निर्मूलन, व्यसनमुक्ती, लोकसंख्या विषयक जाणीव जागृती, अध्यात्ममुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला सबलीकरण या प्रश्नांवर सोपी उत्तरं सापडली, तरच आमचा खरा विकास साधेल. महात्मा गांधीजी म्हणत, 'जे श्रम प्रतिष्ठा शिकवते ते खरं शिक्षण.' शिक्षणाने एकाच वेळी बौद्धिक आणि शारीरिक शक्तींचा विकास झाला, तरच राष्ट्राचा विकास होतो. म्हणूनच लक्षात ठेवायचं-

खरे शिक्षण । ते विवेक जागवी
करी बुद्धिजीवी । माणसाला ॥ १
खरे शिक्षण ते। सद्भाव जागवी
खरे-खोटे दावी । स्पष्टपणे ॥ २
जीवनाचा अर्थ । कळे शिक्षणाने
जोडितसे मने । समाजाची ॥ ३
हिंसा, क्रौर्य, घात । यांना ठेवी दूर
आणि प्रेमा पूर। विद्या तीच ॥ ४
सेवाभावनेला । श्रेष्ठ मानितसे
शिक्षण ते असे। सर्वोच्च की ॥ ५
अपूर्ण माणसा । करीतसे पूर्ण
शिक्षण ते धन्य । सर्वकाळी।। ६
जीवन वाहिले । शिक्षण प्रसारा
वंदावे त्या थोरा । सदोदित ॥ ७
ज्ञानाचे अमृत। लाभे शिक्षणाने
धन्य होई जिणे। जरी क्षुद्र ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# बेशिस्तपणे वागणाऱ्या अकलूज बांधकाम विभागातील अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी बेशिस्त वागणाऱ्या अकलूज बांधकाम विभागातील अधिकारी सुनीता पाटील यांच्यावर तात्काळ कारवाई करावी यासाठी सोलापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंता यांना निवेदन दिले.



देण्यात आलेल्या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की, नातेपुते पिरळे काम अतिशय निकृष्ट पद्धतीने झाले असून रस्ता बद्दल नागरिकांना होणारा त्रास व होणारी दुर्घटना त्या बद्दल वेळोवेळी आपल्या विभागाला सांगुन पण या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आले दि २५/०५/२०२५ रोजी अतिवृष्टी झाल्याने मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्यामध्ये नातेपुते पिरळे रोडवर गुंजखळी येथील शेतकरी श्री.धोंडीबा इजुगडे यांची बैलगाडी पाण्यामध्ये वाहुन गेली सुदैवाने मोठा अनर्थ टळला हलगर्जीपणामुळे एका शेतकऱ्याला जिव गमवावा लागला असता. सदर घटनेस अकलूज बांधकाम विभागाच्या सुनिता पाटील व विभागातील अकार्यक्षम अधिकारी जबाबदार आहेत. तुम्ही त्यांना सूचना देवून सुद्धा आपण दिलेल्या सूचनांचे त्यांनी पालन केले नसल्यामुळे सदरची घटना घडली आहे. बेशिस्तपणे वागणाऱ्या आपल्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई करावी अन्यथा आपल्या विरोधामध्ये सोलापूर जिल्हा अधिकारी कार्यालय येथे राष्ट्रवादी स्टाईलने आंदोलन करण्यात येईल. आपण स्वतः यामध्ये लक्ष घालून योग्य ती कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी केली.

सुनिता पाटील यांना मुख्य अभियंता यांनी पाऊस, अतिवृष्टी होणाऱ्या ठिकाणी योग्य ती काळजी घेण्याच्या सुचना दिल्या होत्या पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्यांच्या या चुकी मुळे एका शेतकऱ्याला जिव गमवावा लागला असता याला जबाबदार स्वतः अकलूज बांधकाम विभागाच्या सुनिता पाटील आहेत यांच्या वरती शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी त्यांचे निलंबन करावे. अन्यथा आम्ही पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन करणार आहे या घटनेची उच्चस्तरीय चौकशी ची मागणी सुध्दा संबंधित विभागाच्या मंत्र्यांन कडे करणार आहे.

# देव देवळात, माणूस माणसात आणि धर्म धर्मात आणला : व्याख्याते रविकुमार ठावरे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा इतिहास समजून घ्या आणि संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी त्यांचे विचार आचरण करा अहिल्यादेवींच्या विचाराने संस्कारक्षम पिढी घडेल.अहिल्यादेवींनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला घाट बांधले. त्यांनी देव देवळात, माणूस माणसात आणि धर्म धर्मात आणला असल्याचे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते रविकुमार तावरे पाटील यांनी नातेपुते येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या ३०० व्या जयंती कार्यक्रमात व्यक्त केले.कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास नगराध्यक्षा अनिता लांडगे व जि. प. सदस्या ऋतुजा मोरे यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आली. यावेळी माजी आ. अँड. रामहरी रुपनवर, उपनगराध्यक्ष अतुल पाटील,





माजी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, हनुमंतराव धालपे, चंद्रकांत ठोंबरे, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, उद्योजक अतुल बावकर, माळशिरस पंचायत समितीचे मा.सदस्य माऊली पाटील, नगरसेवक रणजीत पांढरे, अण्णासाहेब पांढरे, शिवसेनेचे नेते राजकुमार हिवरकर पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड, माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख सतीश सपकाळ, राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव समितिचे अध्यक्ष राजेंद्र पांढरे, प्रेम देवकते, डॉ. विठ्ठल कवितके, डॉ. नरेंद्र कवितके, अजेश पांढरे, प्रवीण काळे, बाळासाहेब पांढरे, माऊली सरक, शक्ति पलंगे, देविदास चांगण, गणेश उराडे, संतोष काळे, माऊली उराडे, नंदू लांडगे, सनी गवळी, अभिजीत चांगण, अजित पांढरे, बंटी सोरटे, संजय उराडे, शशीकांत कल्याणी, अमित चांगण, सचिन पांढरे, सोमनाथ काळे, अमोल लांडगे, अक्षय ठोंबरे, अमरजित जानकर आदी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ठेकेदारांनी कोणतेही तडजोड न करता वेळेत आणि दर्जेदार काम पूर्ण करावे- किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या विशेष सहकार्यातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत १८ लाख २८ हजार रुपये खर्चित येथे यतिमखाना परिसरात रस्ता कॉंक्रिटकरण कामाचे शुभारंभ करण्यात आले.

याप्रसंगी एजाज शेख, महबूब पठाण, इरफान शेख, बिलाल शेख इमरान मंडपवाले जुबेर शेख, जमीर शेख, मोहीम शेख, कुरेशी, निराशा शेख, मीराशाब शेख, उमर शेख, जब्बार शेख,, सय्यद चाचा, सद्दाम शेख, केशरबाई मणियार, शामला ताई जाधव,अन्नपूर्णा जाधव, शहजाद शेख, मालानबी शेख, बिलाल शेख, रियाज शेख, सलीम शेख, महादेव राठोड,वसंत कांबळे, फिरोज पठाण, आनंद गाडेकर, सुहास सर जाधव आदींच्या उपस्थितीत या रस्ता कामाचे विधिवत पूजन करून शुभारंभ करण्यात आले. प्रभाग क्रमांक 22 मधील यतिम खाना परिसरात बऱ्याच दिवसापासून रखडलेल्या या रस्त्याच्या कामाला मुर्त स्वरूप प्राप्त झाले. येथील रहिवाशांच्या मागणीनुसार रस्ता कामाचे आज शुभारंभ करण्यात आले.

रखडलेल्या रस्त्याच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे पावसाळ्यात साचणारे पाणी चिखल खड्डे आणि वाहनधारकांचे अपघात यामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांना आता दिलासा मिळणार आहे विकास कामांमध्ये गुणवत्ता हा सर्वोच्च निकष असावा ठेकेदारांनी कोणतेही तडजोड न करता वेळेत आणि दर्जेदार काम पूर्ण करावे असा सल्ला देखील यावेळी ठेकेदारांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी या शुभारंभ प्रसंगी दिले. या पुढील काळात देखील प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांच्या माध्यमातून या पुढील काळात प्रभागाचा सर्वांगीण विकास साधणार असल्याचेही यावेळी किसन जाधव म्हणाले.

दरम्यान यावेळी प्रभागातील नागरिकांनी किसन जाधव यांचे आभार मानत प्रसिद्ध किराणा दुकानदार परिसरातील ज्येष्ठ नागरिक होन्कुळे मामा आणि त्यांचे चिरंजीव काशिनाथ होन्कुळे यांच्या उपस्थितीत फटाक्यांची कडकडाट करत भला मोठा पुष्पहार घालून त्यांचे सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पुढील काळात प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहाल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या रस्ता कॉंक्रिट करून कामाच्या शुभारंभ प्रसंगी प्रभाग क्रमांक २२ मधील आबाल वृद्धांसह नागरिकांची उपस्थिती होती.

# करमाळा शहरात झालेल्या चोरीच्या गुन्ह्यातील 5 ग्रॅम सोन्याचे सुमारे 46000 हजार रु. किमतीचे दागिने आरोपीकडून जप्त




**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** शहरातील मेन रोडवरील आनंदी ज्वेलर्स येथे एका अनोळखी महिलेने कानातील झुमके पाहण्याच्या उद्देशाने दुकानातील ४६००० हजार रु. किमतीचे सोन्याची अंदाजे ०५ ग्रॅम वजनाची झुमक्याची जोडी चोरून घेऊन गेली होती. तसा गुन्हा करमाळा पोलीस ठाण्यात गु.र.नं ३५९/२०२५ भा.न्या. संहिता कलम ३०५ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक रणजित माने यांनी वेगवेगळी पथके तयार करून घटनेच्या ठिकाणावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून तसेच घटनास्थळाचे तांत्रिक विश्लेषण करून गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळवून सदर महिला सालसे येथे राहणारी रेश्मा संतोष सुकळे (वय-३७) (मुळगाव-सरणवाडी ता. परांडा, जि. धाराशिव) आहे असे निष्पन्न झाले, आरोपीचा शोध सुरू झाल्याने ती मिळून येत नव्हती.

यानंतर पोलिसांनी गोपनीय बातमीदारामार्फत तसेच नातेवाईकांकडे चौकशी केल्याने आरोपी महिला दि. १०/०६/२०२५ रोजी राहत्या घरी असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपी महिलेस, महिला पोलीस अंमलदार पवार यांच्या मदतीने पोहेकॉ शेळके यांनी महिला आरोपीस ताब्यात घेऊन करमाळा पोलीस ठाण्यात आणल्यानंतर चौकशी केली असता सदर महिला आरोपी सहकार्य करत नसल्याने सदर गुन्ह्यात दि. ११/६/२०२५ रोजी सायं. ६.३७ वा. अटक करण्यात आली होती.

तपासा दरम्यान आरोपी महिलेने गुन्हेतील चोरी दिलेला मुद्देमाल काढून दिला. पुढील तपास पोहेकॉ शेळके करीत आहेत.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.प्रीतम यावलकर, उपविभागीय अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजित माने, पो.स.इ संदेश चंदनशिव, सपोफौ डी.एस.वाडगे, पोहेकॉ भाऊराव शेळके, पोकॉ हरिदास निमगिरे, पोकॉ प्रसाद काटे व मपोकॉ शितल पवार यांनी केली आहे.

# आषाढी वारी निर्विघ्न पार पाडण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा - उपमुख्यमंत्री पवार




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 6 जुलै 2025 रोजी होत असून 26 जून ते 10 जुलै 2025 हा संपूर्ण यात्रा कालावधी आहे. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या व अन्य पालख्यांचे त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणे पंढरपूरकडे प्रयाण होणार आहे. संपूर्ण वारी कालावधीत पालख्या, दिंड्या त्यांच्या समवेत असणारे वारकरी, भाविक यांना पालखी मार्ग, पालखी तळ, पालखी विसावा ठिकाण, रिंगण व पंढरपूर शहरात सर्व प्रकारच्या उत्कृष्ट सोयी सुविधा संबंधित प्रशासकीय यंत्रणेने अत्यंत काटेकोरपणे उपलब्ध करून द्याव्यात त्यासाठी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व ही आषाढी वारी निर्विघ्नपणे पार पाडावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

आषाढी वारी 2025 च्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या नियोजनाच्या पूर्वतयारीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे येथून घेतला. याप्रसंगी दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले यांच्यासह संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले की, आषाढी वारी मध्ये सर्व मानांच्या पालख्या व अन्य पालख्या प्रमुख व विश्वस्त यांच्या सूचनेप्रमाणे पालखी मार्ग पालखी मुक्काम ठिकाण विसावा ठिकाणी व रिंगण व पंढरपूर शहरात वाखरी येथे आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यावर्षी पाऊस लवकर सुरू झालेला असून पावसाचे प्रमाण अधिक असू शकते त्या दृष्टीने पालखी मार्गावर, तळावर आवश्यक त्या ठिकाणी जलावरोधक मंडप उत्कृष्ट दर्जाचे टाकावेत. शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली करावी. पालखी सोहळा व वारकऱ्यांना या कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही या दृष्टीने सर्वांनी दिलेली जबाबदारी अत्यंत नियोजनबद्धरित्या पार पाडावी. या सोयी सुविधा निर्माण करताना आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. पुणे, सातारा व सोलापूर जिल्हाधिकारी यांनी पालखी मार्गावर त्यांच्या त्यांच्या हद्दीत पालखी मुक्कामी ठिकाणी विसावा ठिकाणी जनरेटर ची व्यवस्था ठेवावी. कारण पाऊस लवकर सुरू झालेला आहे तसेच यावर्षी पाऊस अधिक प्रमाणात येण्याची शक्यता गृहीत धरून पालखी सोहळा प्रमुख व सोबतच्या दिंड्यांमध्ये येणारे वारकरी यांना पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वीज नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही या दृष्टीने तेवढ्या प्रमाणात जनरेटर व्यवस्था करून ठेवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले. यासाठी जिल्हा परिषदेचा सेस मधील निधी वापरावा. जर हा निधी नसेल तर जिल्हा नियोजन समिती मधून निधी उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

पोलीस विभागाने देहू व आळंदी येथून पालख्या निघाल्यानंतर त्यांच्यासमवेत असलेल्या शौचालय वाहने, पाण्याचे टँकर तसेच अन्य सुविधा पुरवणाऱ्या लोकांसाठी देहू, आळंदी ते पंढरपूर पर्यंत एकच पोलीस विभागाचा युनिक पास उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून त्या त्या जिल्ह्याच्या हद्दीत जाताना या लोकांना पर्यायाने वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे पवार यांनी सांगून पालखी मार्गावर तसेच संपूर्ण वारी कालावधीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देण्याचेही त्यांनी सुचित केले.

यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत कुलकुंडवार यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने आज रोजी पर्यंत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत सादर केली. तसेच पोलीस विभागाने संपूर्ण वारी कालावधी पोलीस बंदोबस्त व गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती पोलीस विभागाचे आय जी सुनील फुलारी यांनी दिली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आषाढी वारी 2025 च्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत पंढरपूर शहरासह मानाच्या पालख्या व अन्य पालख्या त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. पालखीतळांचे, विसावा ठिकाणांचे मागील वर्षीपेक्षा अडीच पट म्हणजेच 75 हजार घनमीटर चे मुरमीकरण करण्यात आल्याचे सांगून मुक्कामाच्या ठिकाणी 29 वॉटरप्रूफ मंडप टाकण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच कायमचे व तात्पुरत्या शौचालयामधून 156 सक्सन व जेटिंग मशीनच्या माध्यमातून मैला बाहेर घेऊन जाण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय ठेवून कॉरिडॉर ची व्यवस्था करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासन वारीचे अनुषंगाने पूर्वतयारी पूर्ण केलेली असून वारीसाठी सज्ज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी तसेच सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनीही वारीच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाची माहिती दिली.

# पावसामुळे शहरात वाहतूक नियोजन कोलमडले

## वाहतूक पोलीस व महापालिकेची निष्क्रियता



**पुणे (कटूसत्य वृत्त):–** शहरात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण शहराचा ताळमेळच बिघडवला आहे. थोडा पाऊस पडला तरी रस्ते जलमय होणे, वाहतूक ठप्प होणे, पाणी तुंबणे आणि हाल होणे या गोष्टी आता पुणेकरांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. महापालिकेच्या पावसाळीपूर्व नियोजनातील अभाव आणि ढिसाळपणामुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.

महापालिकेने दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, खड्डेमुक्ती आणि रस्त्यांची देखभाल यासाठी नियोजन जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात शहराच्या विविध भागांमध्ये अजूनही नाले तुंबलेले आहेत, रस्त्यांवर खड्ड्यांची संख्या वाढली आहे आणि अनेक ठिकाणी खोदकाम अपूर्ण अवस्थेत आहे.

परिणामी, अगदी थोड्या पावसातही शहरातील मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये गुडघाभर पाणी साचत आहे. चेंबरमधून पाण्याचे प्रवाह दिवसभर रस्त्यावर वाहत आहेत.

पुण्यातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, शहरातील प्रमुख रस्त्यांवर प्रचंड कोंडी निर्माण होत आहे. मेट्रोचे काम, पाइपलाइन बदलण्याचे प्रकल्प, आणि रस्ते दुरुस्ती अशी अनेक कामे महापालिकेने एकाच वेळी सुरू ठेवली असून, यांचे योग्य नियोजन करण्यात आलेले नाही.

अपूर्ण कामांमुळे रस्त्यांवर चिखल, खड्डे आणि अडथळे निर्माण होत आहेत. शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अनेक ठिकाणी वाहतूक पोलीस उपलब्ध नसतात त्याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेचे अध्यक्ष रोहन सुरवसे पाटील यांनी म्हटले आहे.

पुणे महापालिकेने तातडीने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी अपूर्ण नालेसफाईची कामे युद्धपातळीवर पूर्ण करणे, खड्ड्यांची तत्काळ दुरुस्ती करणे, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नियोजन करणे अत्यावश्यक झाले आहे. नागरिकांकडून वेळोवेळी महापालिकेला सूचना, तक्रारी आणि मागण्या केली जात असल्या तरी त्याला प्रतिसाद अत्यंत कमी मिळत असल्याचे चित्र आहे.

> पुणे महापालिकेकडून दरवर्षी सांगण्यात येते की, पावसाळ्याच्या अनुषंगाने सर्व तयारी पूर्ण झाली आहे, मात्र प्रत्यक्षात ही हमी फसवी ठरत आहे. अपूर्ण नालेसफाई, रस्ते खोदकाम, विस्कळीत झालेले वाहतुकीचे नियोजन, प्रचंड वाहतूक कोंडी ही केवळ महापालिका प्रशासनाची निष्क्रियता नसून पुणेकरांच्या सुरक्षिततेशी आणि आरोग्याशी खेळ आहे.
>
> **- रोहन सुरवसे पाटील**
> अध्यक्ष, स्वाभिमानी ब्रिगेड महाराष्ट्र राज्य.

# मोहोळसाठी नवे बसस्थानक आणि डेपो मंजूर करावा : बारसकर



**मोहोळ (कटुसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मोहोळ शहरात तालुक्यासाठी बीओटी तत्त्वावर चांगल्या पध्दतीने एस.टी. स्टैंड करावे आणि मोहोळ शहरामध्ये नवीन एस.टी. बस डेपो मंजूर करुन मिळावा, अशी मागणी शिवसेना ओ.बी.सी. राज्य प्रमुख रमेश बारसकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नियोजित सोलापूर दौऱ्यादरम्यान त्यांनी प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या क्रांती भवन, शिवसेना कार्यालय येथे भेट दिली. यावेळी मोहोळ येथून पंढरपूर मार्गे सांगोला, कोल्हापूर, रत्नागिरी, लांजा, गोवा, इचलकरंजी, इस्लामपूर, सातारा, आटपाडी, विटा व टेंभुर्णी मार्गे पुणे, मुंबई, अहिल्यानगर, शिर्डी, धुळे, नाशिक, कुर्डुवाडी अशा शेकडो गाड्यांची आवक जावक होत आहे. मोहोळ तालुका हा सोलापूर जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्या कारणाने तेथे बस स्टँडची व्यवस्था म्हणावी अशी अद्यापपर्यंत झालेली नाही. तसेच सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्व तालुक्यात एस.टी. बस डेपो आहे. किंबहुना पश्चिम महाराष्ट्रामध्ये ५७ तालुक्यामध्ये जवळ-जवळ सर्वच तालुक्यामध्ये एस.टी. बस डेपो आहे. परंतु मोहोळ तालुक्यामध्ये एस.टी. बस डेपो अद्यापपर्यंत नाही. मोहोळ तालुका हा १०४ गावांचा तालुका आहे. त्यामुळे मोहोळ शहरामध्ये एस. टी. बस डेपो होणे अत्यंत गरजेचे आहे, अशी मागणी माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी परिवहन मंत्री सरनाईक यांच्याकडे केली.

यावेळी जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, अतुल क्षीरसागर, मंगेश पांढरे, गणेश गावडे, सागर अष्ठुळ, अजय कुर्डे, श्रीकांत गाढवे, आबा कांबळे, सुरज जम्मा, गोडसे, शिंदे, सौरभ बारसकर, जितेंद्र आष्टुळ, विजय लवटे, सुलतान पटेल, उमेश गोटे, राजू गुंड, शिवाजी पासले, प्रकाश सोनवणे, सोमनाथ माळी, सोमनाथ भालेराव, प्रशांत बारसकर, ऋषिकेश शिंदे, आर्यन बारसकर, आकाश सिताप, विशाल कांबळे, सुरज जाधव, विशाल पवार, रामा माळी, रामा भालेराव, चेतन सादिगले आदी उपस्थित होते.

**पेनूर येथेही स्वागत**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पेनूर येथेही उत्स्फूर्त असे जंगी स्वागत करण्यात आले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनी त्यांचा सत्कार केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार घालून शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये छत्रपती शिवरायांची महाआरती यावेळी ना. सरनाईक यांच्या हस्ते पार पडली. ग्रामपंचायत कार्यालयामध्ये युवा सरपंच सुजित आवारे यांनी त्यांचे स्वागत केले.

# हुंडा विरोधात मराठा समाजाचा निर्णय स्तुत्य

## इतर समाजांनीही अनुकरण करावे - ॲड.चव्हाण



**पुणे (कटूसत्य वृत्त):–** "पुण्यातील वैष्णवी हगवणे हिच्या हुंड्याच्या कारणावरून झालेल्या दुर्दैवी मृत्यूने संपूर्ण समाजाला हादरवून टाकलं आहे. यातून बोध घेत मराठा समाजाने विवाह आचारसंहिता आखली ही स्वागतार्ह गोष्ट आहे. समाजाने आता हुंडा, अनावश्यक खर्च आणि प्रतिष्ठेच्या बेड्या झुगारून आदर्श बदल घडवण्यासाठी एकत्र यायला हवं," अशी ठाम भूमिका मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. शंकर चव्हाण यांनी मांडली. चव्हाण म्हणाले की, "मराठा समाजाने विवाहातील अनावश्यक प्रदर्शन, हुंडा, डीजे नाच, मानपान यासारख्या जुनाट आणि अपप्रथा थांबवण्यासाठी जे ठोस निर्णय घेतलेत, त्याचं मनःपूर्वक अभिनंदन करतो. समाजाने विवाह समारंभ अधिक साधा, शिस्तबद्ध आणि सन्मानजनक करण्यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे आखली आहेत. हे फक्त मराठा नव्हे, तर सर्वच समाजांसाठी आदर्शवजा आहे."या नव्या आचारसंहितेमुळे विवाह खर्चात कपात होणार, मुलींच्या हक्कांचे रक्षण होणार आणि नवदांपत्याच्या भविष्यासाठी आर्थिक स्थैर्य निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'आता वेळ आली आहे की प्रत्येक समाजाने हुंड्याविरोधात उभं राहून कुटुंबप्रथांवर पुनर्विचार करावा,' असा सल्लाही त्यांनी दिला. मराठा समाजाच्या नव्या निर्णयानुसार, हुंडा घेणाऱ्या कुटुंबांशी सामाजिक संबंध तोडण्याचा निर्णय घेतला आहे. विवाहात अनावश्यक खर्च टाळून ती रक्कम वधू-वराच्या भविष्यासाठी एफडीमध्ये गुंतवली जाणार आहे. सामूहिक विवाह सोहळ्यांना प्राधान्य दिलं जाणार आहे. डीजे नाच, फटाके, प्री-वेडिंग शूट्स, मानपान यावर निर्बंध घातले आहेत.याविषयी बोलताना ॲड. शंकर चव्हाण म्हणाले, 'या निर्णयामुळे सामाजिक मानसिकतेत परिवर्तन होईल आणि विवाह म्हणजे प्रतिष्ठेचं प्रदर्शन नव्हे, तर दोन कुटुंबांचा जबाबदारीने उभा केलेला संसार असेल, ही भावना रूजेल.' शेवटी, चव्हाण यांनी राज्य सरकार आणि इतर समाजांना आवाहन केलं की, 'अशा आदर्श आचारसंहितेचा विचार करून महिलांच्या सन्मान आणि सुरक्षित भविष्यासाठी कायद्याचे आणि समाजशास्त्राचे उत्तम उदाहरण घडवावं.'


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109



(सरकार मान्य)


**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण



**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) कंगना राणावतचा झाशीच्या राणीवर आधारित चित्रपट २) कलर (मराठीत) ३) कसदार, जोमदार ४) एक फळ ५) पु.ल.देशपांडे यांचे पूर्ण नाव ६) राजाचे आसन, राजगादी ८) औषध (हिंदीत) १२) पुराणकालीन कळलाव्या मुनी १३) क्रिकेटमधील फोर (मराठीत) १५) धावणे (इंग्रजीत) १७) पंधरा गुणिले चार १९) हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेता-***** शहा २०) छ. शिवरायांच्या ध्वजाचा रंग २१) पैसे (इंग्रजीत) २२) पुण्यातील एक प्रसिध्द बाग २४) श्रीविष्ण पत्नी, लक्ष्मी देवीचे एक नाव २७) एक म्हण-*** तोंडी मोठा घास २८) राज्य चालविणारे गव्हर्मेंट, शासन २९) अंगावरील बारीक केस ३१) योध्दा पूर्वी वापरत ते अश्व जोडलेले वाहन ३३) नव्वदच्या दशकातील एक हिंदी चित्रपटांची नायिका ३५) पाहुणे ३७) शहर ३९) रितेश देशमुखचा नुकताच प्रदर्शित झालेला चित्रपट, विठ्ठलाला या नावाने संबोधतात ४३) सूर्य (इंग्रजीत) ४५) अमिताभ बच्चन यांच्या पत्नीचे नाव

**आडवे शब्द :** १) मराठी सिनेसृष्टीतील एक विनोदी कलाकार
५) प्राण्यांचा राजा, केसरी
८) पाच दुणे ९) कविता करणारा
१०) दान देण्याची वृत्ती ११) इच्छा, कामना
१३) चारीही बाजूंनी चौकोनी आकार असलेली आकृती
१४) ६०+१०
१६) मादीच्या विरूध्दार्थी शब्द १८) चिंतन
२०) पुष्कळ, भरपूर २३) महाविद्यालयीन शिक्षकांना या नावाने संबोधतात
२५) पाणी, तोय २६) स्वच्छतेसाठी आपण जवळ ठेवतो तो कापडी नॅपकीन
२८) प्रश्न (हिंदीत) ३०) जळण ३२) एक (इंग्रजीत)
३४) नेत्र, लोचन ३६) श्रवणेंद्रिय, कर्ण ३८) माग उलट लिहा
४०) दहाची संख्या ४१) मस्ती, खुमखुमी
४२) कॉम्प्युटर याच्या सहाय्याने चालविला जातो
४४) मुस्लीम बांधवांनी देवाला केलेली प्रार्थना ४६) निरूपयोगी कागदांचा गठ्ठा
४७) एकाग्र, मग्न ४८) तारीख (इंग्रजीत) ४९) नवीन (हिंदीत)

## सुडोकु - 276

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | 2 | 6 | | | 9 | | 1 |
| | | | 9 | 1 | | | | 2 |
| | 9 | | | 5 | 4 | | | 8 |
| | 2 | | | 4 | 5 | 8 | 1 | 7 |
| 8 | 5 | | 7 | | | 3 | | |
| 4 | | | | | | 2 | 6 | 5 |
| 6 | | 5 | | | 9 | | 2 | |
| | 3 | | | | 2 | 5 | | |
| | | 9 | 5 | | 8 | | 4 | 6 |

# अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अन्नदानाबरोबरच अक्कलकोटच्या विकासात मोलाचे योगदान- आ. सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून शहरातील राजेफत्तेसिंह क्रीडांगणावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करून संस्थानकालीन वारसा जपत आहेत, अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अन्नदान या पवित्र कार्याबरोबरच विविध उपक्रमासह श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकासात देखील मोलाचे योगदान असल्याचे मनोगत आमदार- सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने राजेफत्तेसिंह क्रीडांगण येथे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम आमदार- सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते शनिवारी संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते. अध्यक्ष स्थानी मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले हे होते. या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अक्कलकोट नगरपरिषदेचे प्रशासन अधिकारी शैलेश बिराजदार हे उपस्थित होते. दरम्यान श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

प्रास्ताविक करताना जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले म्हणाले महाराष्ट्र शासन, राज्याचे मुख्यमत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यभरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करीत आहे, अन्नछत्र या न्यासाकडून जनहितार्थ विविध उपक्रम हाती घेत असताना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन याला महत्व देत कार्यरत आहेत. ते पुढे बोलताना म्हणाले, संस्थान काळातील गावामध्ये दुतर्फा वडाची वृक्ष असायची मात्र काळानुरूप ती आता पहायला मिळत नाही, मात्र अन्नछत्र मंडळाने सोलापूर रस्त्यावर दुतर्फा वृक्षांची लागवड करण्यात आली. सदरची लागवड ही वळसंग व पुढे सोलापूर शहराच्या सीमेपर्यंत करण्यात येणार होती, मात्र राष्ट्रीय महामार्गाच्या वतीने सदरची झाडे लावण्यात येणार असल्याने वृक्षारोपण करता आले नाही. पुढील काळात शहरातील शासकीय जागेसह अन्य ठिकाणी अन्नछत्र मंडळाकडून वृक्षारोपण व संवर्धन मागणी नुसार करण्यात येणार असल्याचे जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले म्हणाले.

पुढे बोलताना आमदार- सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र परिवार विविध क्षेत्रात पुढाकार घेत चांगले काम करत आहे, या परिवारासोबत खारीचा वाटा उचलत लोकसेवक म्हणून व कल्याणशेट्टी परिवार कायम सोबत राहू असे सांगून, श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये अन्नछत्र या न्यासामुळे विकासात भर पडत आहे. असे आमदार कल्याणशेट्टी म्हणाले. या प्रसंगी त्यांनी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन या बाबतचे महत्व त्यांनी स्पष्ट करून सांगितले. अनछत्र मंडळाचे कार्य सातासमुद्रापार जावो अश्या शुभेच्छा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केल्या.

या प्रसंगी विद्याधर गुरव, धुळप्पा बजे, यांची समयोचित भाषणे झाली.

या कार्यक्रमास मॉर्निंग, सुप्रभात ग्रुप, निसर्ग सेवा फाउंडेशन चे पदाधिकारी, सदस्य आणि अमोलराजे जन्मेजयराजे भोसले मित्र मंडळ व लेझीम संघ सह अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, लाला राठोड, संतोष भोसले, ॲड. संतोष खोबरे, मनोज निकम, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रभाकर मजगे, प्रवीण शहा, शिवलिंग स्वामी, सुनील गोरे, प्रमोद लोकापुरे, मतीन पटेल, उमेश पाटील चप्पळगांव, अलीबाशा अत्तार, मैनुद्दीन कोरबू, सरफराज शेख, राजशेखर हिप्परगी, विलासराव कोरे, शिवराज स्वामी, नरसिंग क्षीरसागर, अश्पाक काझी, दत्ता कटारे, बाळा शिंदे, योगेश अहंकारी, योगेश कटारे, अप्पी स्थावरमठ, कांत झिपरे, सौरभ मोरे, वैभव मोरे, रोहित खोबरे, वासू कडबगांवकर, किरण पाटील, विठ्ठलराव दिकसंगी, चंद्रकांत कालीबत्ते, चंद्रकांत सोनटक्के, मेजर श्रीकांत मोरे, मेजर किरण जाधव, उषा हंचाटे, गजानन पाटील, जयसिंह राठोड, सुरेश पाटील, डॉ. राजाभाऊ मलंग, डॉ. विनायक बुधले, बसवराज माशाळे, बाबा पाटील, स्वामीराव मोरे, पी.डी. गायकवाड कुरनूर, मल्लिनाथ मजगे, दिलीपराव महिंद्रकर, दिनेश पटेल, विलासराव राठोड, प्रीतेश किलजे, सिद्धेश्वर मोरे, कलशेट्टी व चनशेट्टी बंधू, गणेश गोबुर, महेश शावरी, राजाभाऊ इंगळे, मनसूर फुलारी, राजकुमार भोसले, अतिश पवार, सिद्धराम माळी, धनंजय गाढवे, नागेश कलशेट्टी, केदार माळशेट्टी, आकाश सूर्यवंशी, बालाजी पाटील, लखन झंपले, बाळासाहेब कुलकर्णी बाबलादकर, राचप्पा वागदरे, अभिमन्यू ताड, माळी मामा, गोरख माळी, सुरेश सुरवसे, विजय मोरे यांच्या सह संजय गोंडाळ, शितल जाधव, वैभव नवले, सुरज सावंत, बंडू पाटील, सागर शिंदे, आकाश शिंदे, सनी सोनटक्के, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, प्रवीण घाडगे, कुमार पाटील, चेतन शिंदे, लक्ष्मण मचाले, महेश दणके, राजू माकणे, आनंत क्षीरसागर, गोविंदराव शिंदे, धनंजय गडदे, सोमशेखर जमशेट्टी, गोटू माने, राहुल इंडे, महांतेश स्वामी, स्वामिनाथ बाबर यांच्या सह वृक्ष मित्र बहुसंख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. प्रकाश सुरवसे तर आभार प्रा. मनोज जगताप यांनी मानले.



**राम-लक्ष्मणाच्या जोडीला माझे नेहमीच सहकार्य राहील**

आमदार- सचिन कल्याणशेट्टी व त्यांचे बंधू मिलन कल्याणशेट्टी हे श्री क्षेत्र अक्कलकोटच्या चौफेर विकासासाठी सतत झटणारे नेतृत्व लाभले आहे. विकास कार्यात आजवरच्या लोकप्रतिनिधी मध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी हे अव्वल ठरले आहे. विकासाच्या माध्यमातून तीर्थ क्षेत्र नगरीचा चेहरा- मोहरा बदलण्याचे महत्वपूर्ण काम ते करीत आहेत. त्यांना मोलाची साथ मिलन कल्याणशेट्टी हे देत आहेत. श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकास कार्यासाठी राम-लक्ष्मणाच्या जोडीला माझी खंबीर साथ राहणार आहे.

**- जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले**
संस्थापक अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट

# आम्ही निवडणुकीत पडलो, पण संपलो नाही- इम्तियाज जलिल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एमआयएम पराभूत झाली परंतु संपली नाही. आजही जनतेच्या मनात एमआयएम बद्दल प्रेम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते, अच्छे दिन येणार आहेत.

त्यांना अच्छे दिन आले की नाही, माहिती नाही परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एमआयएमला अच्छे दिन नक्कीच येतील, असा विश्वास माजी खासदार तथा एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलिल यांनी व्यक्त केला.

सोलापुरच्या दौऱ्यावर आल्यानंतर त्यांनी नई जिंदगी येथील सहारा मल्टिपर्पज हॉल येथे कार्यकर्त्यांशी मेळाव्यातून संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष तथा शहराध्यक्ष फारुक शाब्दी, अन्वर सादात, शौकत पठाण आदी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष जलील म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एमआयएम पूर्ण ताकदीने उतरणार आहे. एमआयएमला हरविण्यासाठी काहीही केले जाईल, कोणाचीही कोणासोबत युती किंवा आघाडी होईल. पैशांचा प्रचंड वापर केला जाईल. कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत सजग रहावे, असे आवाहन केले.

प्रदेश कार्याध्यक्ष शाब्दी म्हणाले, मी विधानसभा निवडणुकीची जेवढ्या अतुरतेने वाट पहात नव्हतो, तेवढ्या अतुरतेने महापालिका निवडणुकीची वाट पहात आहे. एमआयएमवर आणि खासदार असदोद्दिन ओवेसी यांच्यावर प्रेम करणारा मोठा वर्ग आहे. सोलापूरच्या इतिहास यंदाच्या महापालिका निवडणुकीत एमआयएम अधिक दमदार कामगिरी करेल.

**मला पाडले, आता तुमच्या मागे लागणार**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत माझा पराभव करण्यासाठी सर्वजण एकवटले. मी २४ वर्षे पत्रकार म्हणून काम केले आहे, त्यानंतर मी आमदार व खासदार झालो. मी आता माझ्या मूळ पदावर आलो आहे. तुम्ही मला पाडले, मी तुमच्या मागे लागलो आहे, असे सांगत मंत्री संजय सिरसाट यांची आपण झोप उडविली आहे. त्यांनी केलेला गैरव्यवहार बाहेर काढला असल्याचेही प्रदेशाध्यक्ष जलील यांनी सांगितले.



# पत्रकारांनी स्वत:च्या कुटुंबासाठीही वेळ द्यावा - नलावडे

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** पत्रकार हा समाजाचा आरसा असतो. पत्रकारांना समाजातील सर्वच घडामोडीबाबत जागृत राहून महत्त्वाचे कर्तव्य पार पाडावे लागते. परंतू स्वतःच्याच कुटुंबाकडे दुर्लक्ष न करता पत्रकारांनी आपल्या कुटुंबासाठी वेळ देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन निवृत्त शिक्षणाधिकारी व सुयश विद्यालयाचे अध्यक्ष शिवदास नलावडे यांनी येथे केले. व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्यावतीने पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार आणि शहर, तालुक्यातील पत्रकारांच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप शुक्रवारी (दि. १२) संघटनेच्या राज्य कार्यालयात करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी निवृत्त तहसीलदार मदनराव वायकुळे, व्हॉइस ऑफ मीडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ,शाम थोरात ,अमोल आजबे, मयूर थोरात, प्रवीण पावले ,प्रदीप माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अहमदाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. समाजात वावरत असताना पत्रकारांवर अनेक जबाबदाऱ्या असतात. रात्री बेरात्री कोणतीही घटना घडली तरी ते सतत कार्यरत असतात. पण कुटुंबाकडे दुर्लक्ष होते.

मात्र पत्रकारांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठीही वेळ द्यावा, असे आवाहन नलावडे यांनी केले. स्मार्ट अकॅडमीचे संचालक सचिन वायकुळे म्हणाले, मुलांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर आपल्या मुलांसोबत मैत्रीपूर्ण वातावरण ठेवावे, असे स्पष्ट केले.

प्रस्ताविकात अजित कुंकूलोळ म्हणाले, बार्शीत केवळ संघटनेतील सदस्य असलेल्या पत्रकारांच्या पाल्यांनाच नव्हे तर तालुक्यातील सर्वच पत्रकारांच्या १०० मुलांना सुमारे एक लाख रुपयांचे शालेय साहित्य वाटप केले आहे. जिल्यात पहिल्यांदाच हा उपक्रम राबवल्याचे कुंकूलोळ यांनी सांगितले. सूत्रसंचालन संदीप अलाट यांनी केले तर आभार शाम थोरात यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश झिंगाडे, विजय शिंगाडे, समाधान चव्हाण, विक्रांत पवार, ओंकार हिंगमीरे, जमीर कुरेशी,अपर्णा दळवी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**या गुणवंतांचा झाला सन्मान**

डॉ. साक्षी प्रशांत काळे (फिजिओथेरपिस्ट), साक्षी प्रदीप माळी, सिद्धांत अमोल आजबे, संस्कृती सिद्धांत बसवंत, वेदांत सचिन वायकुळे, हर्षद आनंद शेटे, तन्वी उमेश काळे, सुरभी चंद्रकांत करडे या दहावी, बारावीच्या गुणवंत मुलांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

# जिल्हा परिषद प्रशासनाची पालखी सोहळ्या साठी जय्यत तयारी - सिईओ जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी पालखी सोहळा - 2025 जिल्हा परिषद प्रशासनाने पालखी सोहळ्या साठी जय्यत तयारी करणेत आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्हा परिषदेत आज आषाढी यात्रे निमित्त भाविकांना देणेत येणारे सुविधांची माहिती देणे साठी पत्रकार परिषदेचे आयोजन करणेत आले होते.

या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री जयकुमार गोरे यांचे मार्गदर्शनाखाली विविध सुविधा देणेत येत आहेत.

त्यांनी पुढाकार घेतले मुळे पालखी मार्गांनी निगडीत १६ रस्ते मंजूर झाले आहेत.

असेही सिईओ जंगम यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे मार्गदर्शन घेणेत येत असून कामाचे टप्पे ठरवून देऊन कामाचे सनियंत्रण करणे साठी ॲप तयार करणेत आले असल्याचे सिईओ जंगम यांनी सांगितले.

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज, आळंदी, जि. पुणे, श्री. संत तुकाराम महाराज, देहू, जि. पुणे , श्री. संत मुक्ताबाई, मुक्ताबाई, जि. जळगांव, श्री. संत सोपान महाराज, सासवड, जि. पुणे, श्री. संत निवृत्तीनाथ महाराज, त्र्यबकेश्वर, जि. नाशिक, श्री. संत एकनाथ महाराज, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. संत नामदेव महाराज, पंढरपूर, जि. सोलापूर, श्री. विठ्ठल रुखमाई संस्थान, कौंडण्यपूर, जि. अमरावती , श्री. संत चांगावटेश्वर देवस्थान, सासवड, जि. पुणे, श्री. संत निळोबाराय महाराज, पिंपळनेर, जि. अहिल्यानगर या प्रमुख पालख्या सोहळ्या समवेत येणारे भाविक व मार्गावरून समवेत येणारे सर्व दिंड्यां मधील भाविकांची सुविधा करणेत आलेली आहे.

पालखी मार्गावर जिल्ह्यातील एकुण 81 ग्रामपंचायतीचा सहभाग असून सदर पालखी मागाची लांबी 120 किलोमिटर आहे. मागील वर्षी 76 वारकरी सुविधा केंद्र होते, यंदाच्या वर्षी 103 वारकरी सुविधा केंद्र मंजुर करण्यात आलेली आहेत.

मागील वर्षी 31 जलावरोधक मंडप (3,15,000 रा३) होते व यंदाच्या वर्षी 94 जलावरोधक मंडप (4,92,875 रा३) व 9 जर्मन हँगर मंडप (2,20,000 राळ) मंजुर करण्यात आलेले आहेत.

सदर पालखी सोहळ्याकरिता 536 अधिकारी व 4212 कर्मचारी वृंद यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.




**स्वच्छता व अनुषंगिक सेवा**

सुविधांकरिता मागी वर्षी फिरते शौचालय 3925 होते, या वर्षी 4315 फिरते शौचालय व त्यासाठी 325 स्वच्छता सेवकांची नेमणूक व 114 सक्शन व जेटिंग मशीन तयार ठेवण्यात आले.

**पाणी पुरवठा विभाग**

पाण्याचा विचार केला असता मागील वर्षी 211 पाणी टँकरची व्यवस्था करण्यात आलेली होती. यंदाच्या वर्षी 234 पाणी टँकर व टँकर भरणेकामी 791 स्त्रोत निश्चित करण्यात आलेले आहे. मागच्या वर्षी व 102 पाणी उदभव स्त्रोत निश्चित करण्यात आले होते. यंदाच्या वर्षी 112 पाणी उदभव स्त्रोत निश्चित करण्यात आलेले आहेत. महिला वारकरीकरिता मागील वर्षी 1100 स्नान गृह व 91 हिकरणी कक्ष स्थापन करण्यात आले होते. यंदाच्या वर्षी 1824 महिला स्नान गृह व 110 हिकरणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**आरोग्य विभाग**

वारीमध्ये आरोग्य सुविधांबाबत मागील वर्षाकरिता 11 अतिदक्षता विभागाची निवड करण्यात आलेली होती. यंदाच्या वर्षी 21 अतिदक्षता विभाग निवड करुन 121 आरोग्य दुत(बाईक ॲबुलन्स) वारीकरिता तयार ठेवण्यात आले आहे.

**ग्रामपंचायत विभाग**

ग्रामपंचायत विभागामार्फत पालखीतळ, पालखी मार्ग व परिसर स्वच्छ करुन घेणे, विद्युत पुरवठयाची सोय, विदयुत रोषनाई करणे, 5 दिवस मुक्कामाच्या ठिकाणी बोरगांव, वेळापुर, पिराची कुरोली, भंडीशेगाव व वाखरी येथे ड्रोजची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालखीतळ व मार्गावरील अतिक्रमण काढणे, जंतूनाशक फवारणी पावडर धुरळणी इ. प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे काम सुरु आहे. तात्पुरते स्वच्छता कर्मचारी नेमणूक करुन पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर गावात झालेल्या कचरा व घाणीचे निर्मुलन करण्याचे नियोजीत आहे. ग्रामपंचायतीमार्फत हिरकणीकक्ष, स्नानगृह, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, मसाज सुविधा, मोबाई चार्जिंग पॉईट इ. गावात देण्यात येणाऱ्या सुविधाचे लोकेशन अंतिम करुन मॅप करण्याचे काम सुरु आहे.वारकऱ्यांच्या सोईकरिता दिशा दर्शक फलक 15 फुट उंचीवर लावण्यात आलेले आहेत.

**पाणी व स्वच्छता विभाग**

पाणी व स्वच्छता विभागामार्फत आषाढी वारी पालखी सोहळयामध्ये 10 मानाच्या पालख्यांनाकरिता 60 ठिकाणी 4315 तात्पुरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. 10 शौचालयापाठीमागे (200 लिटरचे) एक ड्रम याप्रमाणे 4315 शौचालयासाठी 432 ड्रम निश्चित करण्यात आलेले आहे. मैलगाळ व्यवस्थापनासाठी 57 सक्शन मशीन, 57 जेटींग मशीन तयार ठेवण्यात आले आहे. विभागामार्फत 1500 स्वच्छता व साफसफाई स्वंयसेवक नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच तात्पुरते शोचालय व्यवस्थापनासाठी पुरवठादारामार्फत एकावेळी 283 कर्मचारी, 42 पर्यवेक्षीय कर्मचारी नेमले जात आहेत. सदर वारीकरिता जिल्हास्तरावरुन 6 अधिकारी वर्ग, 31 जिल्हास्तरीय कर्मचारी व 86 विस्तार अधिकारी व ग्रामसेवक असे एकूण 123 अधिकारी व कर्मचारी नेमले जातात.

**महिला व बाल विकास विभाग**

महिला व बाल विकास विभागामार्फत 110 हिकरणी कक्ष, महिलासाठी बेड, सॅनिटरी पॅड व्हेंडींग डिस्पोजर मशीर, लाईट, पंखे, मेंट, खुर्ची, स्वच्छ पिण्याचे पाणी, कमरापेटी, स्तनदा मातांसाठी गोपनीय कक्ष या करिता 476 अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

आरोग्य विभागामार्फत प्रति 3 किलोमीटर अंतरावर 143 आरोग्य सल्ला व उपचार केंद्रांची स्थापना, 58 रुग्णवाहिका (102 आणि 108) दिंडी सोबत 121 आरोग्य दुत (बाईक ॲब्युलन्स), पालखी मार्गावर 16 प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आधुनिक वैदयकिय उपकरणे व वैदयकिय फर्नीचर खरेदी करुन सुसज्ज असे स्वतंत्र उपचार कक्ष स्थापन करण्यात येत आहे. दिंडी प्रमुखांना 4500 औषधोपचार किटचे वाटप, 1230 अधिकारी / कर्मचार व 2529 आशा वर्कर यांची नेमणूक करण्यात येत आहे. आरोग्य विभागाअंतर्गत 2468 बेड्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आषाढी वारीसाठी 350.00 लाख रुपये औषध खरेदीकामी निधी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**बांधकाम विभाग**

बांधकाम विभागामार्फत 94 जलावरोधक मंडप (4,92,875 रा३) व 9 जर्मन हँगर मंडप (2,20,000 राळ) उभारणी करण्याचे काम सुरु आहे. 41 बाह्य रस्ते व पालखी तळ सुधारणाचे काम सुरु करणेकरिता र. रु. 230.00 लक्ष व 30 रस्त्याचे व पुल दुरुस्तीचे कामाकरिता र. रु. 380.00 लक्ष ग्रामविकास विभागामार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे. पालखी मार्गावरील 82 ग्रामपंचायतीतील मुक्कम, विसावा पालखीतळ व मार्ग अतिक्रमण काढण्याचे काम सुरु आहे. जिल्हा परिषदेच्या कृति कार्यक्रमाअंतर्गत 1 महिना, 15 दिवस व 8 दिवस अगोदर पाणी स्त्रोतांचे सर्व्हेक्षण व पाणी नमुने तपासणी व फेर तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. टँकर व तात्पुरते शौचालय करिता रस्त्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. 15 दिवस अगोदर पालखी तळ रस्ते सुधारणा व जंतुनाशक फवारणी पावडर धुरळणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. 8 दिवस अगोदर स्वच्छते विषयी हॉटेल तपासणी, पाणी स्त्रोतांचे व टँकर भरणा ठिकाणाचे शुध्दीकरण करुन घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. 5 दिवस आगोदर हॉटेल कामगारांची वैदयकिय तपासणी, ॲबेटींग व गटार आणि घाण पाण्यावर डस्टींग इ. कामे करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. 3 दिवस आगोदर हॉटेल पाण्याची ओ.टी. तपासणी, स्नान गृह, हिरकणी कक्ष, आपती व्यवस्थापन कक्ष, आरोग्य केंद्र यांची स्थापना करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी जलावरोधक मंडप उभा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. आषाढी वारीच्या एक दिवस अगोदर दिंडी प्रमुखांना औषधोपचार किटचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पालखीतळ सजावट (रांगोळी, दिशा, दर्शक फलक, विद्युत रोषणाई इ.) करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

**जिल्हा परिषदेमार्फत नाविण्य उपक्रम**

वाकऱ्यांकरिता गर्दीच्या सनियंत्रणासाठी पालखीतळावर ड्रोनचा वापर, मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी 400 फुट मसाजर तसेच विठ्ठल उर्जा रथ वारकऱ्यासांठी 4 फिरते मोबाईल चार्जिंग सुविधा (1 विठ्ठल उर्जा रथामध्ये 100 चार्जिंग पॉईट) इ. सोई-सुविधा देण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे.

# ग्रीनफिंगर्स कॉलेजच्या 64 विद्यार्थ्यांची TCS मध्ये निवड

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट व शिवरत्न शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (ळउर) कॅम्पस ड्राईव्हमध्ये ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी, अकलूज येथील 64 विद्यार्थ्यांची निवड ळउर कंपनीमध्ये झाली आहे, तसेच 12 विद्यार्थ्यांना इतर नामांकित कंपन्यांमध्ये संधी प्राप्त झाली आहे. एकूण 76 विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाल्याने महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण आहे.76 विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली ही बाब खूपच प्रेरणादायी आहे. ळउर (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) सारख्या नामांकित क्ळ कंपनीमध्ये 64 विद्यार्थ्यांची निवड होणे ही संस्थेच्या गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची पावती आहे. त्याचप्रमाणे इतर 12 विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळणे हेही कौतुकास्पद आहे.

महाविद्यालयातील यशाची परंपरा कायम राखत यंदाही मोठ्या प्रमाणात निवड झाल्याचे यामधून दिसून येते. यामागे कॉलेजच्या आधुनिक सुविधा, रम्य व अभ्यासासाठी पोषक परिसर, आणि नेहमी मार्गदर्शन करणारे अनुभवी प्राध्यापक यांचा मोठा वाटा आहे.

महाविद्यालयाच्या स्थापने पासून आजपर्यंत 1300 हून अधिक विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीची संधी प्राप्त झाली आहे, ही संस्थेच्या गुणवत्तेची साक्ष देणारी बाब आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच ॲप्टिट्यूड टेस्ट, स्पोकन इंग्लिश, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट आणि ॲडऑन कोर्सेस आयोजित केले जातात. यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होऊन, दरवर्षी विविध कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निवड होत आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट चे अध्यक्ष विजयसिंह मोहिते पाटील, कार्याध्यक्ष आ. रणजितसिंह मोहिते पाटील, सचिव खा. धैर्यशील मोहिते पाटील, उपाध्यक्षा सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते पाटील, चेअरमन ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज विश्वतेजसिंह मोहिते पाटील, सहसचिव शिवदास शिंदे, ट्रस्टचे सर्व संचालक मंडळ, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, प्राचार्य, शिक्षकवृंद व शिक्षकेतर सेवक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मी हुसेनबी फैजअहमद माढेकर असे जाहीर करते की, माझे पती कै.फैजअहमद अल्लाबक्ष माढेकर हे दि.२२/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. माझे पती कै.फैजअहमद अल्लाबक्ष माढेकर यांना प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांनी परवाना क्र. MH13192/SHR/1994 दिलेला होता. सदरचा परवाना वाहन क्र. MH-12 HC 2603 वाहनावर असून सदर मयत माझ्या पतीच्या पश्चात पत्नी या नात्याने सदरचा परवाना माझ्या नांवावर करण्यासाठी मी प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे अर्ज केलेला आहे. सदर परवान्याबाबत कोणाची कांही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ०७ (सात) दिवसाच्या आत मूळकागदपत्रासह प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे संपर्क साधवा. म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

सही /-
हुसेनबी फैजअहमद माढेकर